प्रकरण चौथे

# ''पानिपत''

# कादंबरी सविस्तर चर्चा

- ऐतिहासिक कादंबरीचा आढावा
- कादंबरीचे स्वरुप
- प्रेरणा
- कथानक (कादंबरीचा आशय)
- उपकथानकांची योजना
- व्यक्तिचित्रण
- प्रमुख व्यक्तिरेखा
- दुय्यम व्यक्तिरेखा
- स्त्री व्यक्तिरेखा
- भाषाशैली
- निवेदनपद्धती
- वर्णनशैली
- वातावरण निर्मिती
- ''पानिपत'' कादंबरीचे गुणदोष
- समीक्षकांची मतमतांतरे
- समारोप

## ■ ''पानिपत'' कादंबरी सविस्तर चर्चा :-

तिसऱ्या प्रकरणात पानिपतच्या युद्धाचे स्वरुप, कारणे व परिणाम पाहिल्यानंतर चौथ्या प्रकरणांत ''पानिपत'' कादंबरीवर सविस्तर चर्चा करणार आहेत. विश्वास पाटील यांनी कथा, कादंबरी व नाटक या तिन्ही वाङ्मय प्रकारात लेखन केले असले तरी कादंबरीकार म्हणूनच त्यांना सर्वाधिक प्रतिष्ठा लाभली. कथालेखनाने त्यांच्या लेखन प्रपंचाचा प्रारंभ झाला असला तरी कादंबरी क्षेत्रातच त्यांना भरपूर यश मिळाले. ज्या एकाच पहिल्या कादंबरीने पाटील यांना साहित्य जगतात मानांचं स्थान मिळालं त्या ''पानिपत'' कादंबरीचा चिकित्सकपणे अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करणार आहोत. विश्वास पाटील यांच्या ''पानिपत'' कादंबरीचा प्रत्यक्ष अभ्यास सुरु करण्यापूर्वी मराठीतील इतर ऐतिहासिक कादंबऱ्यांचा विचार करु.

## ■ ऐतिहासिक कादंबरी धावता आढावा :-

१८६७ मध्ये 'विविधज्ञान विस्तारा' मधून ''मोचनगड'' नावाची रा.भि. गुंजीकर यांनी लिहलेली 'कल्पित गोष्ट' क्रमशः प्रसिद्ध होऊ लागली. हिच मराठीतील पहिली ऐतिहासिक कादंबरी होय. गुंजीकरांच्या पद्धतीने कल्पित पात्रांच्या मध्यवर्ती कल्पनेवर उभारलेली दुसरी ऐतिहासिक कादंबरी '१८५७ सालचे बंडाची धामधूम किंवा हंबीरराव व पुतळाबाई' ही होय. ही कांदबरी १८७३ साली विष्णू जनार्दन पटवर्धन यांनी लिहली. 'सुशीला यमुना अथवा वासुदेव बळवंत फडके यांच्या बंडाची धामधूम' आणि 'लक्ष्मी आणि सरस्वती' या दोन कादंबऱ्या लिहून बळवंत मनोहर पंडित यांनी या परंपरेत भर घातली.

ऐतिहासिक कादंबरीकार म्हणून वरील सर्वांची उमेदवारी संपली आणि १८९० मध्ये हरिनारायण आपट्यांनी ऊर्फ हरिभाऊंनी पहिली ऐतिहासिक कादंबरी लिहली. हरिभाऊंची पहिली ''म्हैसूरचा वाघ'' ही मेडोज टेलरच्या 'टिपू सुलतान' या इंग्रजी कादंबरीचे रुपांतर आहे. हरिभाऊंनी ऐतिहासिक कादंबरी

लेखनाची सुरुवात पाश्चात्यांच्या अनुकरणाने केली असली तरी पुढील पाच वर्षात स्वतंत्र प्रज्ञेने कादंबरी लेखन केले. त्यांची 'उषःकाल' ही कादंबरी खूपच लोकप्रिय झाली. पुढील वीस वर्षाच्या कालावधीत त्यांनी 'केवळ स्वराज्यासाठी', 'गड आला पण सिंह गेला', 'मध्यान्ह', 'सुर्योदय', 'सूर्यग्रहण' इत्यादी मराठीशाहीच्या इतिहासावर आधारलेल्या कादंबऱ्या लिहून त्यांनी शिवशाहीचे कथामय स्मारक उभे केले. त्याचप्रमाणे 'रुपनगरची राजकन्या', 'चंद्रगुप्त आणि कालकूट' या कादंबऱ्यातून राजपुतांच्या इतिहासातून मराठी वाचकांना हिंडवले. 'वज्राघात' या विजयनगरच्या साम्राज्याविषयीच्या कादंबरीला समीक्षकांनी कलात्मक कादंबरी म्हणून गौरविली आहे.

हरिभाऊंच्या नंतरचे प्रमुख ऐतिहासिक कादंबरीकार म्हणून नारायण हरी आपटे यांचा उल्लेख केला जाते. १९०९ मध्ये 'अजिंक्यतारा' ही कादंबरी लिहून त्यांनी लेखनाची सुरुवात केली. वास्तव आणि अद्‌भुत यांचा सुरेख संगम त्यांनी घडवून आणला. त्यानंतर १९१२ मध्ये 'मानवी आशा विरुद्ध देवाची इच्छा', 'लांछित चंद्रमा' (१९१४), 'राजपुतांचा भीष्म' (१९१९), 'संधीकाल' (१९२२) व 'आनंदमंदिर' या सहा कादंबऱ्या लिहल्या.

हरिनारायण आपटे आपली अखेरची ऐतिहासिक कादंबरी लिहत होते त्याचवेळी चिं.वि. वैद्य यांची 'दुर्दैवी रंगू' (१९१४) ही फार यशस्वी ऐतिहासिक कादंबरी प्रसिद्ध झाली. रंगूबाईसारख्या बालवयी विधावेच्या दुःखद कहाणीभोवती पेशवेकालीन इतिहासाचा एक खंड गुंफला गेला आहे. ऐतिहासिक पार्श्वभूमीचे प्रत्ययकारी चित्रण ज्या काही थोड्या कादंबऱ्यात आले आहे अशापैकी ही एक कादंबरी म्हणून ओळखाली जाते. सबंध कथेवर पानिपतच्या दारुण अंतिम घटनेची छाया पसरली आहे. वैद्यानी जागोजागी ती कौशल्याने सूचित केली आहे. कथेतील काल्पनिक व ऐतिहासिक भाग अशा तऱ्हेने एकजीव झाला आहे.

हरिनारायण आपटे यांच्या अखेरच्या १९१० ते १९१५ च्या काळात अनेक ऐतिहासिक कादंबऱ्यांची निपज झाली. सहकारी कृष्णाची – 'राजकुंवर', 'शापित महाराष्ट्र', तसेच अनुसया देशपांडे

यांची 'वसईचा वेढा' इत्यादी कादंबऱ्या. याशिवाय १९१६ ते १९३५ पर्यंत सी. के. दामले यांच्या 'दोनशे वर्षापूर्वी' व 'वसईचा रणसंग्राम', ल.ना. जोशी यांच्या 'समर्थ राष्ट्रगुरु', गो.वि. मुजुमदार यांची 'लख्या बारगीर', वा.वि. भिडे यांची 'केंजळगडचा कबजा', 'कोरलईचा किल्लेदार', 'तेजस्वी सतीधर्म', 'पण तिसरा कोण?', 'प्रपितामहाच्या पदावर', 'मुरारी' या कादंबऱ्या तर भि.गो. भिडेकृत 'बालब्रम्हचारिणी', 'रत्नमाला', 'वरश्रीचे वैभव', व.स. देसाई यांची 'अग्निवर्षाव', 'आसुरी लालसा', 'झाशीवाली राणी', 'शाहीमहाल', '१८५७ च्या बंडाचा वणवा' या सर्व ऐतिहासिक म्हणवल्या गेलेल्या कादंबऱ्यातून तोच तो अद्‌भुततेचा प्रभाव, अतिरंजितपणा व तीच ती प्रणयसंकुलता इत्यादी गोष्टी हटकून आढळतात.

१९०९ मध्ये 'तरुण रजपूत' या कादंबरीने नाथमाधव यांनी कादंबरीला प्रारंभ केला. त्यांची 'सावळ्या तांडेल' (१९१४) ही आरमार विषयक कादंबरी जास्त गाजली. ऐतिहासिक कादंबरीचा वारसा चालविताना 'शिवघटना', 'स्वराज्याचे परिवर्तन', 'स्वराज्याचा कारभार', 'स्वराज्याची स्थापना', 'स्वराज्यातील दुफळी' इत्यादी कादंबऱ्या लिहून १६३९ ते १९०७ पर्यंतचा मराठेशाहीचा इतिहास त्यांनी चित्रित केला.

वि.वा. हडप यांनी तर पेशवेकाल प्रधान मानून त्यांच्या भोवती चितारलेल्या एकूण वीस कादंबऱ्या लिहून 'कादंबरीमय पेशवाई' मराठी वाचकापुढे उभी केली. बाजीराव पेशव्याच्या कारकिर्दीतील एकूण आठ कादंबऱ्या आहेत. बाळाजी विश्वनाथवर एकूण चार तर इतर कादंबऱ्यातून पेशवाईतील इतर स्त्री–पुरुषांची व्यक्तिचित्रणे उभी केली.

प्रणयसंकुलता व अद्‌भुतता या पासून त्यातल्या त्यात अलिप्त व भावगंभीर इतिहास चित्रणाने आकर्षक झालेल्या अशा काही कादंबऱ्या साधुदास (गो.गो. मुजुमदार) यांच्या आहेत. 'पौर्णिमा' या पहिल्याच कादंबरीने साधुदास प्रसिद्धीस आले. त्यांची 'मराठेशाहीचा वद्यपक्ष–पूर्वरात्र व उत्तररात्र' ही आणखी एक कादंबरी होय. याच तऱ्हेच्या कादंबऱ्यामध्ये ल.ना. जोशी यांनी १९१७ ते १९३४ पर्यंत 'समर्थ राष्ट्रगुरु', 'अस्तोदय' व इतर नऊ कादंबऱ्या लिहल्या. द.वि. परांजपे यांच्या 'अरिष्ट', 'अस्तप्राय

भानू', 'अस्तंगत भानू', 'रक्ताचे गालबोट', अनुसयाबाई देशपांडे व जानकीबाई देसाई यांनी 'वसईचा वेढा' यशोदाबाई भट यांची 'जिजाबाई', ना.के. बेहरे यांची 'हिंदू कोण', 'शालिवाहन', फडके यांची 'अल्ला हो अकबर' इत्यादी नामवंत लेखाकाबरोबर साहित्यसम्राट न.चिं.केळकर यांची 'बलिदान'इत्यादी कादंबऱ्यानी ऐतिहासिक कादंबरीचा प्रवाह खळखळता ठेवला.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात प्रामुख्याने लक्षात राहवे असे कादंबरीकार म्हणून रणजित देसाई, गो.नी.दांडेकर, ना.स. इनामदार, स.शं. देसाई, शिवाजी सावंत अशा लेखकांनी लेखन केले व ऐतिहासिक कादंबरीला प्रतिष्ठा मिळवून दिली. १९५९ साली प्रकाशित झालेल्या 'सत्तावनचा सेनानी' या वरखेडकरांच्या लक्षणीय कादंबरीपासून नव्या काळातील ऐतिहासिक कादंबरी सुरु होते. पण खरे यश रणजित देसाई यांच्या 'स्वामी' (१९६२) या कादंबरीला मिळाले. 'श्रीमान योगी' (१९६८) ही त्यांची आणखी एक महत्वाची ऐतिहासिक कादंबरी म्हणून उल्लेख करता येईल. महापुरुषाच्या अंतरंगात शिरुन त्यातील 'माणूस' शोधाण्याचा प्रयत्न केला व तो फार यशस्वी झाला. तर घटनाप्रधान मांडणी आणि व्यक्तिप्रधान मांडणीपेक्षा एका विशिष्ट काळालाच त्यातल्या समाजालाच प्रधान नाणून त्या दृष्टीकोनातून ऐतिहासिक कादंबऱ्या लिहणे हा या लेखन पद्धतीतलाच आणखी एक प्रयोग गो.नी.दांडेकरांनी केला. 'बया दार उघड', 'हर हर महादेव', 'दर्याभवानी', 'झुंजारमाची', 'हे तो श्रींची इच्छा'अशा कादंबऱ्या लिहून त्यांनी कादंबरीमय शिवकाल उभा केला.

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील आणखी एक महत्वाची व्यक्ती म्हणजे ना.स.इनामदार होय. 'झेप' या पहिल्याच कादंबरीमुळे ऐतिहासिक कादंबरीच्या प्रवाहातील एक प्रमुख कादंबरीकार म्हणून सर्वमान्य झाले. 'झेप' नंतर 'झुंज' (१९६६) ही कादंबरी प्रकाशित झाली. ती 'झेप' इतकीच लोकप्रिय झाली. उत्तर पेशवाईतील काळ त्यांनी यशवंतराव पवारांच्या अखंड झुंजीतून वाचकांसमोर उभा केला. 'मंत्रावेगळा' (१९७०) ही कादंबरी पळपूटा बाजीराव म्हणून बदनाम असणाऱ्या बाजीरावावर लिहून बाजीरावाची बदनामी धुऊन काढण्याचा प्रयत्न केला. यानंतर बाजीराव–मस्तानीची प्रेमकहाणी 'राऊ'

(१९७२) मध्ये त्यांनी मांडली. तर औरंगजेबच्या जीवनावर 'शहेनशहा' ही आणखी एक यशस्वी कादंबरी त्यांनी लिहली.

स.शं. देसाई यांच्या 'चंबळेच्या पलिकडे', 'महापर्व' तर कॅप्टन बेलवलकर यांची 'अटकेत रोविले झेंडे' (१९७२) ही १२०० पृष्ठांची त्रिखंडात्मक कादंबरी, 'ध' चा 'मा' करणाऱ्या आनंदीबाईची प्रतिमा उजळणारी आहे. भीमराव कुलकर्णी यांची 'ओंकार', 'हरिनारायण' या काही अलिकडील काळातील गाजलेल्या ऐतिहासिक कादंबऱ्या आहेत. पौराणिक कादंबरीत नेत्रदिपक यश मिळविणाऱ्या शिवाजी सावंतांची 'छावा' ही संभाजीच्या जीवनावरील एक ऐतिहासिक कादंबरी वाचकप्रिय ठरली. शिवकाळ आणि पेशवाईतील काळ या ऐतिहासिक कादंबऱ्यामुळे पुन्हा मराठीत अवतरला. त्यात आणखी भर विश्वास पाटील यांच्या 'पानिपत'ने घातली. 'पानिपत' कादंबरीवर आपण पुढील मुद्यात यथावकाश चर्चा करणार आहोत.

## ■ ''पानिपत'' :–

हरिभाऊंच्या खऱ्या अर्थाने सुरु झालेल्या ऐतिहासिक कादंबरीच्या क्षेत्रात अनेक लेखकांनी आपापल्या कुवतीनुसार लेखन केलं. ऐतिहासिक व्यक्ती व घटना प्रसंगाच्या माधमातून लोकांसमोर इतिहास सजीव केला. मात्र ऐतिहासिक व्यक्ती व घटनाकडे लेखक कसे वळले या विषयी मीमांसा करताना प्रा.अविनाश सप्रे म्हणतात – '' वीरवृत्तीबद्दल महाराष्ट्राला सदैव आकर्षण वाटत आले आहे. ऐतिहासिक कादंबरीच्या निर्मितीस हेही कारण सांगता येईल. भूतकाळ आणि सनातनी संस्कृतीबद्दल आदर असणाऱ्या मनांना आपणालाही काही स्वत्व होते. या कल्पनेने मोहरुन येऊ लागल्यामुळे या कादंबऱ्या लोकप्रिय होऊ लागल्या. इतिहासाची नवनवीन साधने उपलब्ध होत राहिल्यामुळे ऐतिहासिक कादंबऱ्या लिहणारा लेखक समाजात रुढ असलेल्या ऐतिहासिक समाजावर अवलंबून न राहता, एक नवा प्रसंगी धाडसी वाटावा असाही दृष्टीकोन येऊ लागला, आणि ऐतिहासिक कादंबऱ्यामधून मांडू लागला. या

काळातील बहुतेक सर्व लेखकांनी इतिहासाचे ललित लेखनात रुपांतर करताना इतिहासाचा चिकित्सक अभ्यास आपापल्या कुवतीप्रमाणे केला आणि संशयास्पद वाटणाऱ्या ठिकाणी आपला निर्णय प्रमाणित मानला. याचाच एक भाग म्हणून काही लेखकांनी समाजात बदनाम ठरलेल्या इतिहास पुरुषांना न्याय देण्याची त्यांची बाजू घेण्याची, त्यांचा पाठपुरावा करण्याची ठाम भूमिकाही घेतली. इतिहासकालीन व्यक्तिच्या शल्याचा शोध घेतला जाऊ लागला. एकूण नवी ऐतिहासिक कादंबरी अशा प्रेरणांच्या मिश्रणातून निर्माण झाली आणि चटकन लोकप्रिय झाली'' [१]

आज ऐतिहासिक कांदबरीचा प्रवाह समृद्ध असला तरी या प्रवाहातील कादंबऱ्यांची निर्मिती मोजकीच होत आहे. हे सत्य नाकारुन चालणार नाही. ऐतिहासिक कादंबरी निर्मितीसाठी लेखकाला इतिहासाचे ज्ञान हवे. त्यासाठी कष्ट उपसण्याची त्याची तयारी हवी. मुळातच इतिहासकालीन शिलालेख, अस्सल कागदपत्रे व इतर आधार साधनांचा त्याला आधार घ्यावा लागते. ऐतिहासिक स्थळांना भेटी देऊन उपलब्ध पुराव्याचा खरेखोटेपणा तपासून पहावा लागतो. असा बराचसा खाटाटोप करावा लागत असल्याने सहसा कोणी ऐतिहासिक कादंबरी लिहण्याकडे वळत नाही. विश्वास पाटील हे मात्र या विषयाकडे वळले आणि भरपूर मेहनतीने ऐतिहासिक सत्य व कल्पकता याचा पुरेपूर वापर करुन एक अजोड कलाकृती त्यांनी वाचकांना बहाल केली. ''या कादंबरीतून मराठी नेतृत्वाची शोकांतिका तर दाखविली आहेच पण निव्वळ नाट्यमयतेच्या आणि उदात्तीकरणाच्या मागे न लागता नेतृत्वाच्या जडणघडणीचा, संस्काराचा आणि विचारपद्धतीचा शोध घेतला आहे. इतिहासातून शिकण्यासारखे खूप असते असे आपण म्हणतो, पण त्यासाठी आवश्यक असणारी चिकित्सक दृष्टी आपण स्वीकारत नाही. ''पानिपत'' चे वेगळेपण या दृष्टीत असल्यामुळे ही कादंबरी ऐतिहासिक असली तरी तिला आजचे 'संदर्भ मूल्य' प्राप्त होऊ शकले आहे.''[२] त्यामुळेच मराठी ऐतिहासिक कादंबऱ्यात मानदंड ठरणारी व ऐतिहासिक कादंबरीचा लोकप्रियतेचा विक्रम प्रस्थापित करणारी कादंबरी म्हणून वाचक व समीक्षकांकडून गौरविली जात आहे.

''पानिपत'' कादंबरीचा तांत्रिकदृष्ट्या विचार केला तर प्रेरणा, कथानक, व्यक्तिचित्रण, वातावरण, निवेदनपद्धती, भाषाशैली या तांत्रिकदृष्टीने अभ्यास करावयाचा आहे. वरील सर्व तांत्रिक अंगाचा विचार करता व्यक्तिचित्रण, कथानक व वातावरण ही कादंबरीची मुलभूत अंगे असून त्या आधारानेच कादंबरीची रचना केली जाते. त्यादृष्टीने कादंबरीची सर्व अंगे, समीक्षकांचे अभिप्राय याचा चिकित्सक अभ्यास करु.

- **प्रेरणा :–**

तत्कालीन समाजाने किंवा परंपरेने ज्या ऐतिहासिक स्त्री–पुरुषावर बदनामीचा शिक्का मारला होता त्यांच्या जीवनातील सुसंगती शोधण्याचा प्रयत्न अलिकडील काही कादंबरीकारानी केला त्यापैकीच विश्वास पाटील एक आहेत. पानिपत युद्धाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी भाऊसाहेब पेशव्याच्या जीवनाचा वेध कादंबरीच्या रुपाने घेतला.

१९७९ साली 'द न्यू हिस्ट्री' हा रियासतकार सरदेसाई यांचा इंग्रजी ग्रंथ वाचतानाच त्यात मराठी माणसाचे सर्वोच्च सद्गुण आणि दुर्दैवी दुर्गुण असल्याचे त्यांना जाणवले. या विषयावर पुढे कधीतरी ५–२५ वर्षात लिहायचे असे त्यांनी ठरविले. मात्र ५–६ वर्षातच त्यांच्या असे लक्षात आले की, मराठी माणसाचे राजकारण, समाजकारण आणि संस्कृती व अन्य ठिकाणीही गळचेपी होत आहे. त्यामुळे ''पानिपत'' विषयावर लवकर लिहले पाहिजे, असे ठरवून त्यांनी टाचणे काढण्यास सुरुवात केली व अथक परिश्रमाने त्यांनी ''पानिपत'' लिहून पूर्ण केली.

''पानिपत'' ही विश्वास पाटील यांची आजवरची सर्वात लोकप्रिय ऐतिहासिक कादंबरी ठरली आहे. या कादंबरीनेच त्यांचे साहित्य जगतातील श्रेष्ठत्व सिद्ध केले. मराठी वाचकांनी व समीक्षकांनी त्यांना 'पानिपतकार' ही संज्ञा बहाल केली. या पूर्वीच प्रकरण दुसरे मध्ये ''पानिपत'' कादंबरीच्या निर्मिती प्रक्रियेविषयी सविस्तर चर्चा केली आहे.

■ **कथानक :—**

१४ जानेवारी १७६१ रोजी पानिपत या ठिकाणी मराठे व दुराणी बादशहा अब्दाली यांच्यात युद्ध संग्राम झाला. त्यात मराठ्यांचा पराभव झाला. या ऐतिहासिक सत्य घटनेवर आधारित ''पानिपत'' या कादंबरीची रचना केली आहे. कादंबरी 'पालखिचा गोंडा', 'दिल्लीवर हमला', 'तख्त की तीर्थ?', 'संगरतांडव' व 'पांढरं आभाळ' या पाच प्रकरणात विभागली आहे. पहिले प्रकरण ७३ पृष्ठांचे आहे. राघोबादादांची उत्तरेतून माघार व नजीबखानचा कसल्याही परिस्थितीत बंदोबस्त करावा असा दत्ताजी शिंदे यास राघोबादादांचा आदेश. त्या आदेशानुसार दत्ताजी शिंदे यांचे नजीबखान व नजीबाच्या मदतीस आलेल्या अब्दालीचे बुराडी घाटावर युद्ध होते त्यात दत्ताजी शिंदे मारला जातो. जनकोजी शिंदे जखमी होतात. उर्वरीत शिंदे सैन्य पळून जाऊन मल्हारराव होळकर यांच्या सैन्यास मिळतात. दरम्यान मल्हारराव होळकर अब्दालीच्या सैन्यावर हल्ला चढवितात परंतु त्यात त्यांना माघार घ्यावी लागते. एवढा भाग प्रामुख्याने पहिल्या प्रकरणात आला आहे. या प्रकरणात दत्ताजी शिंदे यांचा बुराडी घाटावरील मृत्यू या प्रमुख घटनेभोवती हे प्रकरण गोवण्यात आले आहे.

निजामाचा पाडाव करुन मराठी सैन्य विजयोत्सव साजरे करीत असतानाच उत्तरेतून दत्ताजी शिंदे यांच्या मृत्यूची बातमी येते. येथून पुढे 'दिल्लीवर हमला' हे प्रकरण सुरु होते. १२१ पृष्ठांच्या विस्तृत पानात भाऊसाहेबांची मोहिमेवर निघण्याविषयी खल व भाऊसाहेबांना प्रवासात येणाऱ्या अडचणी व अखेर दिल्ली विजय एवढा भाग आला आहे. या प्रकरणात प्रामुख्याने लष्कराला येणाऱ्या अडचणी विस्तृत सांगितल्या आहेत.

'तख्त की तीर्थ?' या मथळ्याखाली असणाऱ्या तिसऱ्या प्रकरणात प्रामुख्याने मराठे कुंजपुऱ्यावर हल्ला चढवून दत्ताजी शिंदे यांचा शिरच्छेद करणाऱ्या कुतुबशहास पकडून शेवटी त्याचा वध करतात. कुंजपुरा पडल्याची बातमी अब्दालीस समजल्याने तो भयंकर चिडतो. कुंजपुऱ्याची आग मस्तकात घेऊन अब्दाली भरली यमुना नदी ओलांडतो व दोन्ही फौजा पानिपतच्या गावानजिक समोरासमोर उभ्या राहतात.

या घटना प्रमुख आहेत. दिल्ली जिंकल्यानंतर दिल्लीची व्यवस्था भाऊसाहेब लावतात. लष्कराची उपासमार थांबविण्यासाठी दिल्लीचे छत फोडून भाऊसाहेब त्याची नाणी पाडतात. याचवेळी भाऊसाहेब व सुरजमलजाट यांच्यात वाद होऊन सुरजमल रातोरात निघून जातो. एवढा भाग या प्रकरणात आला आहे. १०८ पृष्ठांच्या प्रकरणात प्रामुख्याने गोविंदपंताविषयी अधिक विस्तृत माहिती आली आहे.

चौथ्या प्रकरणात प्रामुख्याने युद्धभाग आला आहे. यात प्रमुख मराठे सरदारांचा मृत्यू व मराठ्यांचे अन्नपाण्यासाठी होणारे हाल हा प्रमुख भाग आहे. य शिवाय गोविंदपंत बुंदेले यांच्या युद्धाबरोबरच जनकोजी शिंदे, बळवंतराव मेहेंदळे, होळकर व इब्राहिमखानचा भाऊ यांची प्रमुख पोट्युद्धे दाखविण्यात आली आहेत. 'संगरतांडव' या मथळ्याखाली असणाऱ्या या प्रकरणात पानिपतावरील अडीच महिन्याचा मुक्काम व थंडीमुळे मराठ्यांचे हाल व बळवंतराव मेहेंदळे याची पत्नी सती जाण्याचा प्रसंग इत्यादी प्रमुख घटना गोवण्यात आल्या आहेत.

युद्धानंतरचा पुढील भाग 'पांढरं आभाळ' या पाचव्या प्रकरणात समाविष्ट करण्यात आला आहे. युद्धानंतर मराठी सैन्याचा धीर सुटल्याने ते वाट्टेल त्या दिशेने पळत राहतात. पळणाऱ्या मराठी सैन्याची अब्दालीच्या सैन्याकडून बेसुमार कत्तल व त्यांची लूट, युद्धात वीरमरण आलेल्या प्रमुख मराठे सरदारांवर सुजाने केलेले अग्निसंस्कार, इब्राहिमखान व जनकोजी शिंदे यांचे हाल हाल करुन केलेला मृत्यू, जाट राजाचे औदार्य व सुजाचे मराठ्यांविषयी असणारी सहानुभूती व शेवटी पानिपताच्या पराभवाची बातमी समजल्यामुळे भाऊसाहेब व विश्वासरावांच्या शोकाने नानासाहेब पेशव्यांचा झालेला मृत्यू इथपर्यंतच संपूर्ण भाग पाचव्या प्रकरणात आला आहे.

विश्वास पाटील यांनी बखरी, पोवाडे, ऐतिहासिक पत्रे व इतर अस्सल साधनांचा वापर करुन जास्तीत जास्त सत्याला धक्का न लावता ''पानिपत'' लिहण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. निर्भेळ इतिहासप्रमाणे त्यांनी काल्पनिक घटना प्रसंगाला कथामालेत यशस्वी गोवले आहेत. उदा. दत्ताजी शिंदे यांच्याकडे सलुखाच्या वेळी आलेला नजीबखान पळून माघारी जातो तो प्रसंग. (पृ.७)

या ठिकाणी लेखकाला फक्त दत्ताजी शिंदे व नजीबखान यांच्यात बुराडी युद्धापूर्वी अनेकदा सलूख चालला होता मात्र तो अनेक वेळा फिसकटला होता एवढाच ऐतिहासिक सत्याचा आधार आहे.

जनकोजी शिंदे व मल्हारराव होळकर यांच्या पथकाने जनावरांसाठी वैरण आणताना पानिपत येथे गिलच्याशी झालेली चकमक व त्यात गिलच्यांनी वैरणीची गाडे पेटवून दिलेली हकीकत.

या घटनेविषयी सत्याचा एवढाच भाग आहे की, पानिपतवर अब्दालीच्या सैन्याने मराठ्यांची चारी बाजूने कोंडी केली होती. त्यातून चोरुन लपतछपत धान्य किंवा वैरण लष्कराच्या ठिकाणी पोचविली जाते. अचानक गिलच्याचा हल्ला होऊन ते वैरण पेटवून देत अथवा धान्य पळवत एवढया ऐतिहासिक सत्यावर त्यांनी वरील प्रसंगाची निर्मिती केली आहे. याचप्रमाणे यात्रेकरु व भाऊसाहेब यांच्यातील घडून आलेला प्रसंग. इत्यादी प्रसंग पाटील यांनी एवढ्या चलाखीने कादंबरीत योजलेले आहेत की, त्यांची सत्यता नाकारता येत नाही. कादंबरीमध्ये इतिहासाइतकीचा कल्पकता हा घटक महत्वाचा असल्यामुळे कादंबरीच्या निर्मितीमध्ये तर्क–वितर्क घटनांची सत्यता पारखण्यासाठी व कथानकाची योग्य परिणामकारकता साधण्यासाठी वापरलेले असतात. म्हणून डॉ.वि.भा.शहा यांचे विचार महत्वाचे वाटतात ते म्हणतात – ''कल्पकतेच्या वापरामुळेच प्रत्येक साहित्यकृती ही स्वतंत्र अशी नवनिर्मित होत असते.''[३] वास्तवरुपी जीवनदर्शन घंडविणारे कथानक निर्माण करताना कादंबरीकार वास्तविक ऐतिहासिक घटना प्रसंगाच्या बरोबर काही काल्पनिक प्रसंगाची व व्यक्तिची निर्मिती करीत असतो. त्यात त्याने किती इतिहास घ्यावा व किती काल्पनिक भाग घ्यावा याचे प्रमाण प्रत्येक लेखकावर अवलंबून असते. इतिहासाचा भाग जास्त झाला तर सामान्य वाचकाला ती रुक्ष वाटते तर काल्पनिक भाग जास्त झाला तर तिच्यावर इतिहासाशी प्रतारणा केल्याचा आरोप होतो. अशा दोन्ही गोष्टींचा विचार करुन कादंबरीकाराला कादंबरी लिहावी लागते. कादंबरी मांडणीतील प्रत्येक घटना–प्रसंग प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मूळ घटना–प्रसंगाला उठाव आणित असतो. कादंबरीची विविध अंगे स्वाभाविक व सुसंगत वाटतील अशीच कथानकाची मांडणी लेखकाला करावी लागते.

कोणत्याही कादंबरीत कथानक असते,तर संघर्ष हा कादंबरीच्या कथानकाचा आत्मा असतो. कथानक उत्साहवर्धक होण्यासाठी कादंबरीकार संघर्षमय प्रसंगाची योजना करीत असतो. लढाया, मारामाऱ्या, चकमकी यासारख्या शारीरिक संघर्षाप्रमाणेच एका समुहाचा दुसऱ्या समुहाशी चाललेला संघर्ष चितारलेला असतो. हा संघर्ष सत्ता व संपत्ती यासाठी झालेला दाखविण्यात येतो. संघार्षाची कादंबरीतील मांडणी व्यक्तिविरुद्ध व्यक्ती, अथवा एका वेगळ्या समुहाविरुद्ध दुसरा वेगळा समुह, वेगवेगळ्या जाती व धार्मातील तंटे उभे केलेले असतात. हाच संघार्ष कादंबरीचे कथानक तयार करीत असतो. मात्र कादंबरीत संघर्ष किती उठावदारपणे लेखक रंगवितो यावर कादंबरीचे यशापयश पुष्कळसे अवलंबून असते. म्हणूनच या ठिकाणी डॉ. वि.भा. शहा यांचे विचार लक्षात घेणे जरुरीचे वाटते. ''इतिहासकार विशिष्ट व्यक्ती उभी करतो तर कादंबरीकार त्या व्यक्तीला वैश्विक करीत असतो. स्थलकालाच्या पलिकडे तो त्यास घेऊन जात असतो. याला कारण त्याच्या ठिकाणी असलेली निर्मितीक्षम स्वरुपाची कलात्मक कल्पकता असते. या कलात्मक कल्पकतेच्या सहाय्याने संभवनीयतेच्या तत्वानुसार तो इतिहासातील वास्तव व घटना प्रसंगाच्या आधारे प्रारंभ, मध्य, शेवट अशी सौंदर्यतत्वानुसार मांडणी करीत असतो. त्यामुळे त्याची मांडणी गुंतागुंतीची तरीही नाविण्यपूर्ण व वैशिष्टयपूर्ण होत असते. जर ती शोकांतिका असेल तर विशिष्ठ घटनांच्या रचनाबंधामुळे नायकावर कोसळलेल्या आपत्ती किंवा स्वभाजन्य दोषांमुळे नायकाला स्वीकारावे लागलेले अपयश यांचाही विचार त्याला करावा लागतो. ऐतिहासिक अनुभुतीची अशी कलात्मक मांडणी करताना ऐतिहासिक कादंबरीकार त्या घटनाप्रसंगातून निर्माण झालेले चिंतनही व्यक्त करीत असतो.''[४] थोडक्यात ऐतिहासिक व्यक्तीची प्रतिमा अधिक उजळ किंवा अधिक सुस्पष्ट करण्याचे कार्य ऐतिहासिक कादंबरीकाराला करावे लागते. म्हणूनच नरहर कुरुंदकर म्हणतात–'' ऐतिहासिक कादंबरी वास्तव व काल्पनिक यामध्ये दुभंगलेली नसते तर ऐतिहासिक कलाकृती वास्तविक सत्य आपल्या पोटात घेऊन जिवंत झालेल्या असतात.''[५]

कादंबरीत जे असंख्य लहान मोठ्या घटना प्रसंग घडून येत असतात त्यातूनच एक बांदेसूद असे चित्र उभे राहते. प्रत्येक कादंबरीत कादंबरीकाराला काहीतरी सांगावयाचे असते हे जे त्याला काही सांगावयाचे असते त्याचे बीज त्याच्या डोक्यात असते. कादंबरीचे बीज अशा रीतीने मनातून स्फुरल्यानंतर त्यातूनच हळूहळू कादंबरीचे कथानक आकार धारु लागते. जीवनविषयक जाणिवांचे दर्शन घडवून आणताना ती परिणामकारक व्हावी यासाठी कादंबरीकाराला काही पथ्ये पाळावी लागतात. कादंबरीतील संघर्ष चढत्या क्रमाने मांडून त्याला वाचकाचे कुतूहल जागृत करावे लागते. कथानकाच्या वरील विचाराप्रमाणेच विश्वास पाटील यांच्या ऐतिहासिक कादंबरीतील कथानक आहे असे म्हणता येईल. त्यांच्या प्रमुख कथेला अन्य प्रवाह मिळाले आहेत. त्यामुळे मुख्य कथानक उठावदार झाले आहे.

■ **उपकथानकांची योजना :–**

''पानिपत'' कादंबरीतील कथानक मुख्यतः जरी ऐतिहासिक प्रसंगावर आधारित असले तरी अन्य प्रवाह स्वरुपात त्यास येऊन मिळणारी उपकथानके कादंबरीत आली आहेत. मूळ ऐतिहासिक घटनेलाच पूरक व पोषक अशी उपकथानके पाटील यांनी योजली आहेत. दमाजी गायकवाड पेशव्याना डाव्या हातानेच का मुजरा करीत होता? याचे कथानक प्रसंगानुरुप थोडक्यात सांगितल्याने मूळ कथेला कुठे धक्का लागलेला नाही. याशिवाय कुकडी घाटावरील बुसीच्या तुकडीने केलेला हल्ला. पेशवाईचे वस्त्रे मिळविण्यासाठी नानासाहेबांना करावा लागणारा खटाटोप, जयपूर वारसा हक्काचा वृत्तांत, जानु भिंताडा याच्या भिंताडा आडनावाचे कथानक, गोविंदपंत खरेचे बुंदेले कसे झाले याचे कथानक या सर्व घटना म्हणजे मूळ कथेतून जन्मलेल्या उपकथा वाटतात. कुंभेरीचा वेढा व नजीबखान प्यादाचा फर्जी कसा झाला? या कथा म्हणजे बौद्धिक व राजनैतिक हालचालींचा एक मोहक भाग वाटतो. मराठी लष्कराच्या प्रवासात पौराणिक संदर्भ देऊन जी काही कथानके सांगितली आहेत त्यामुळे ऐतिहासिक घटनापेक्षा पौराणिक कथेलाच प्राधान्य मिळाले आहे. मचकुंदतीर्थची कथा ही तर पूर्णपणे कादंबरीपेक्षा वेगळी वाटते. मोहरम सणाची कथाही ही वरील प्रमाणेच आहे. वास्तविक पाहता उपकथानकाच्या साहाय्याने

इतिहासातील तुटलेले दुवे कादंबरीकाराने जोडावयाचे असतात. त्यापद्धतीने विश्वास पाटील यांनी बराच प्रयत्न केलेला दिसतो.

## ▪ व्यक्तिचित्रण :—

कादंबरीतील कथानकाला जे महत्व प्राप्त होते ते कादंबरीतील व्यक्तिदर्शनामुळे. मानवी जीवन हा कादंबरीचा विषय असला तरी मानवी मन फार मोठे गूढ आहे. कादंबरीकार ही व्यक्तिचित्रणे वाचकांच्या मनावर ठसावी अशा रीतीने आपल्यासमोर मांडतो. कादंबरीकाराच्या व्यापक आणि सुक्ष्म निरीक्षणामुळे ही व्यक्तिमत्वे आपल्या समोर जिवंतपणे साकार होतात, आणि त्यांच्या भावविश्वाशी आपण समरस होतो. कादंरीकाराला जो परिणाम घडवून आणावयाचा असतो त्यावर त्याची व्यक्तिचित्रणे अवलंबून असतात. त्यामुळे कादंबरीत मुख्य, दुय्यम व नाममात्र अशा प्रकारच्या व्यक्ती येतात.

''ऐतिहासिक कादंबरीकार, ऐतिहासिक व्यक्ती जशी जाणवली तशी आपल्या प्रतिभेच्या साहय्याने ती वाचकापर्यंत पाहोचवित असतो.''[६] असे ना.स. इनामदार म्हणतात. म्हणजेच कांदबरीकार इतिहासातील पुराव्याने प्राप्त झालेले घटना प्रसंग अभ्यासतो. त्या काळातील इतर साधनांच्या अभ्यासाने तत्कालीन सामाजिक, राजकीय परिस्थिती समजून घेतो. आणि मग कल्पनेने त्या काळात आणि त्या व्यक्तीच्या मनात प्रवेश करतो. त्यामुळे त्याच्या मनात स्वतंत्र व्यक्तिरेखा निर्माण होते. अशा स्वतंत्र व्यक्तिरेखा म्हणजेच कादंबरीची पात्रे असतात. ही पात्रे अधिक वास्तविक वाटावी यासाठी लेखक आप्ली कल्पनाशक्ती पणाला लावतो. विशिष्ठ घटना—प्रसंगाच्या संदर्भात या व्यक्तीच्या भावभावना काय असतील? त्या कशा वागतील? त्या काय बोलतील? या सर्वांचा विचार करुन तो त्या-त्या व्यक्तिरेखा स्वतंत्ररित्या निर्माण करतो. कथानकाच्या साहाय्याने 'त्या' व्यक्तींना नवे संदर्भ जोडून त्या व्यक्तींना नवे रुप देत असतो. या नव्या रुपातून इतिहासाला अज्ञात असणाऱ्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू तो सहज उलगडून दाखवितो. त्यामुळे कादंबरीत ऐतिहासिक व्यक्तीच्या चित्रणाला पूर्ण रुप येऊ शकते.

त्यासाठी कादंबरीकाराजवळ – ''मानवी मनोव्यापाराचे सूक्ष्म ज्ञान आणि अंतर्भेदी दृष्टी असेलतर कादंबरीतील ऐतिहासिक व्यक्तीचे त्याने केलेले चित्रण श्रेष्ठ दर्जाचे होते.''[७] असे डॉ.वि.भा. शहा यांना वाटते.

''पानिपत'' कादंबरीचा विचार करताना प्रामुख्याने लक्षात येते की, चाळीसच्या वर व्यक्तिरेखा आहेत. पण त्यातील प्रत्येक व्यक्तिरेखा स्वतःचे रंगरुप, स्वभाववैशिष्ठये आणि त्यांचा जीवनविषयक दृष्टीकोन घेऊन वाचकापुढे उभी राहते.

## ▪ प्रमुख व्यक्तिरेखा :–

भाऊसाहेब, विश्वासराव, दत्ताजी शिंदे, जनकोजी शिंदे, इब्राहिमखान गारदी, मल्हारराव होळकर, नजीबखान, नानासाहेब पेशवे, सुजाउद्दौला, सुरजमल जाट आदी प्रमुख व्यक्तिरेखा कादंबरीत आल्या आहेत. या प्रमुख व्यक्तिरेखा ठसठशीत करुन विश्वास पाटील यांनी गोविंदपंत बुंदेले, यशवंतराव पवार, समशेरबहाद्दूर, बळवंतराव मेहेंदळे, नाना फडणीस, विठ्ठल शिवदेव, काशीराज पंडित, दिल्लीचा वजीर गाजीउद्दीन, अब्दालीचा वजीर शहावलीखान, सेनापती जहानखान वगैरे व्यक्तीचे स्वतंत्र व्यक्तिमत्व सहजपणे मनावर ठसावे अशा रेखीवपणे आपल्यापुढे उभे केले आहे. कादंबरीच्या दृष्टीने या व्यक्ती महत्वाच्या असोत अथवा दुय्यम असोत मात्र पाटील यांनी त्यांच्या जीवनात रंगविलेल्या घटना या वास्तवावर व पुराव्यावर आधारलेल्याच आहेत. यातील प्रमुख व्यक्तिरेखांचा आपण विचार करु.

### भाऊसाहेब :–

एक कुशल सेनानी, मुत्सुद्दी, जबाबदार, कुटुंबप्रमुख, सैन्य व सहकारी यांच्या अडीअडचणींची दखल घेणारा जागरुक सेनापती म्हणून भाऊसाहेबांचे चित्र वाचकांसमोर पाटील यांनी उभे केले आहे. मात्र तोफांच्या साहाय्याने हिंदुस्थान पादाक्रांत करुन सार्वभौम मराठी राज्याची स्थापना करु पाहणाऱ्या

भाऊसाहेबांची ही इच्छा तत्कालीन समजाला पचली नाही. भाऊ गर्विष्ठ, अहंकारी, हट्टी असल्याचा तत्कालीन बखार लेखकांनी दिंडोरा पेटवला. मात्र विश्वास पाटील यांनी भाऊसाहेबाच्या व्यक्तिमत्वाचे अनेक अस्सल साधनांच्या साहय्याने खरे दर्शन घडवून तो कसा योग्य सेनानायक होता हे प्रस्तुत कादंबरीत दाखवून दिले आहे. भाऊंच्या चांगल्या गुणाविषयी सांगावे तेवढे कमीच! माहिमेवर निघण्यापूर्वी मराठे सरदारांच्या मनातील किंतू तो दूर करतो. उत्तरेतील प्रत्येक निर्णय घेताना तो शिंदे होळकरांचा सल्ला घेताना दिसतो. आपल्या लष्करावर तो मुलाप्रमाणे प्रेम करताना दिसतो. लष्कर उपाशी अस्ताना त्यांची उपासमार थांबावी यासाठी जाट राजाचा सल्ला न मानता तो दिल्ली किल्ल्यातील रुप्याचे छत फोडून त्याची नाणी पाडतो, सुरजमल जाट हा शिंदे होळकरांच्या अंतस्थ फुस लावणीने पळून गेला तरी राग शांत ठेऊन राहतो. सैन्याची उपासमार वाचविण्यासाठी कुंजपुऱ्यावर धाडसी हल्ला चढवितो. बळवंतराव मेहेंदळे यांची कान उघाडणी करुन जनकोजी शिंदे यांना आस्था दाखवितो. अब्दालीने गोविंदपंताचे पाठविलेले शीर पाहून हजरजबाबी उत्तर देतो, आपल्या सोबत्याला दिलेले वचन पाळताना स्वतः रणांगणात उडी घेऊन शत्रू सैन्याची कत्तल करीत स्वतः प्राणार्पण करणाऱ्या भाऊसाहेबांच्या व्यक्तिमत्वातील अनेक बारकावे आपल्यासमोर विश्वास पाटील यांनी जिवंत साकार केले आहेत.

**नजीबखान :-**

भाऊसाहेबांची व्यक्तिरेखा ज्या ताकदीने उभी केली आहे त्याच ताकदीने नजीबखानाची व्यक्तिरेखा पाटील यांनी उभी केली आहे. आजवर अनेक पानिपतवरील कादंबऱ्या मराठी वाचकांपुढे आल्या मात्र नजीबखानला त्यांनी योग्य न्याय दिला असे वाटत नाही. युद्ध जरी अब्दाली व मराठे यांच्यात झाले असले तरी अब्दालीला हिंदुस्थानात बोलविण्यात नजीब प्रमुख आहे. नजीबखानाला मराठ्यांच्या पत्रव्यवहारात पाताळयंत्री, मायावी, कारस्थानी, सैतान, साप, विश्वासघातकी वगैरे विशेषणे वापरलेली आढळतात. मात्र ही विशेषणे त्याच्या शब्दातून आणि कृतीतून साध्य करुन दाखविण्याचे अमाप कौशल्य

विश्वास पाटील यांच्या लेखनीने केले आहे. भाऊसाहेब नायक म्हणून आपल्याला भारावून टाकतात, पण नजीबची अचाट कुटील नीती आपणांला स्तिमित करते. गाजरासारखा लाल, तीक्ष्ण बारीक डोळ्याचा आखूड दाढीचा देखणा नजीबखान अफगाणिस्तानातून साधा शिपाई म्हणून हिंदुस्थानात येतो. स्वतःच्या बायकोचा गळा घोटून पंधरा वर्षात दिल्लीचा मीरबक्षी बनण्यापर्यंत मजल मारतो. अब्दालीला बोलावून त्याच्या साहाय्याने मराठ्यांचा बंदोबस्त करुन उत्तरेतील आपली सत्ता प्रस्थापित करण्याचा तो घाट घालतो. त्यासाठी कधी तो 'इस्लाम खतरे में हैं' चा पुकारा करुन उत्तरेतील आपले सगळे मुस्लीम बांधव एकत्र करतो. कधी गोड बोलून तर कधी तलवारीच्या पात्याने तो प्रतिस्पर्ध्यांचा गळा कापतो. संकटकाळी माघारी घेण्याची त्याची कुटील नीती वाखाणण्याजोगी आहे. राघोबाचे अरिष्ट येताच तो मल्हारराव होळकरांच्या आश्रयाला पुत्र म्हणून जातो तर दत्ताजीच्या भितीने गोविंदपंत बुंदेले यांच्या बायकोला बहिण मानतो. ज्या बादशाहीचा मीरबक्षी म्हणून मिरवतो त्याच बादशहाच्या वजिराचा बदला घेण्यासाठी त्याच्या बेगमेला हात घालतो. एवढया हीन पातळीवर जाणाऱ्या नजीबाचे प्रसंगानुरुप व्यक्तिमत्व उलगडून दाखविले आहे.

अब्दाली आणि मराठे यांच्यातील तह प्रामुख्याने मोडून इस्लामच्या नावाखाली मोठ्या मिनतवारीने अब्दालीला युद्धास उभा करणारा, पानिपतच्या युद्धानंतरही सुरजमलवर हल्ला करुन पैसे काढा म्हणणारा नजीब पानिपतच्या युद्धाचा कर्ता आहे. आणि त्या दृष्टीने त्याचा बनेलपणा, दुष्टप्णा विविध प्रसंगातून उत्तम प्रकारे प्रकट केला आहे.

**अब्दाली :-**

एक हुशार, कार्यतत्पर, मुत्सद्दी व धर्माचा सच्चा बंदा, एक कठोर सेनापती म्हणून अब्दालीचे व्यक्तिचित्र पाटील यांनी रेखाटले आहे. भाऊसाहेबांना कादंबरीत अती उंचीचे स्थान देताना त्याहून अधिक उंचीचे स्थान आपल्या बुद्धिचातुर्याने अब्दालीला देण्याचा प्रयत्न पाटील यांचा कौतुकास पात्र आहे.

नादिरशहाच्या फौजेतील एक साधा शिपाई सरदार असणारा अब्दाली आपल्यातील असामान्य कर्तृत्वगुणाने अफगाणिस्तानचा बादशहा बनतो. त्याच्यातील असामान्य गुण विश्वास पाटील यांनी वेगवेगळ्या प्रसंगातून दाखवून भाऊसाहेबांपेक्षा अब्दाली कसा वरचढ होता हे दाखवून दिले आहे.

वेळप्रसंगी माघार घेण्याची वृत्ती अब्दालीच्या ठिकाणी कशी होती याचे चित्रण दत्ताजीच्या पहिल्या युद्धावेळेच्या प्रसंगातून दिसून येते. कार्यतत्पर वृत्तीमुळे भरली यमुना ओलांडल्याचा प्रसंग असो अथवा दत्ताजी शिंदे यास एकट्यास बघून बुराडी घाटावर त्याचा केलेला पराभव असो. यातून अब्दालीची कामातील गती दिसून येते. एक मुत्सुद्दी सेनापती असल्याने पानिपत युद्धाअगोदरची प्रतिकूल परिस्थिती अनुकूल करुन घेण्यात त्याला यश आले. भौगोलिक परिस्थितीचा कसा उपयोग करुन घ्यावा हे तो जाणत असल्याने बुराडी घाटावर एकाच वेळी त्याने तीन ठिकाणाहून बुराडी पार करुन दत्ताजीवर हल्ला चढविला. सैन्यातील अन्न दुष्काळावर मात करण्यासाठी त्याने अगोदर गोविंदपंत बुंदेले यांचा काटा काढला. मराठ्यांच्या लष्कराला पाणीपुरवठा करणारा कालवा फोडला. व मराठ्यांना कोंडीत पकडण्याचा त्याने प्रयत्न केला. यातून अब्दालीचा युद्धविषयक अनुभव उकलून दाखविण्यात पाटील यांनी यश मिळविले. भरली यमुना ओलांडूनसुद्धा अब्दाली मराठ्यांवर चाल न करता शांत डोक्याने युद्धाचे डावपेच खेळतो. नजीबाची फसवी लटकी चाल ओळखूनसुद्धा धर्मासाठी तो नजीबाला मदत करतो. वजिरीचे आमिष दाखवून शुजाला आपल्या बाजूस शेवटपर्यंत टिकवून ठेवण्यात तो यश मिळवितो. अगदी युद्धाच्यावेळीसुद्धा राखिवसैन्य, प्रमुख सरदारांच्या युद्धाच्या जागा अगदी कुशाग्र बुद्धीने ठरवितो. वेळप्रसंगी हूल्लड माजविणाऱ्या सैन्याना तो कठोर शिक्षा करीत असल्याने त्याचा सैन्यावर कसा वचक होता. याचा प्रत्यय कादंबरी वाचनातून येतो. युद्धानंतर नानासाहेब पेशव्यांना पत्र लिहून दिल्लीतील मराठ्यांची सत्ता कायम ठेवण्याविषयी सांगतो, यातून त्याच्या समंजसपणा गुणाचा प्रत्यय येतो. एकंदर पाहता एक महत्वकांक्षी धाडशी अफगाण सेनापती म्हणून त्याचे व्यक्तिचित्र स्पष्टपणे लेखकाने उभे केले आहे.

**दत्ताजी शिंदे :-**

पेशव्याच्या कर्जाचा बोजा स्वतःवर घेऊन उत्तरेतील मराठ्यांची बाजू संभाळणारा पेशव्याचा एक विश्वासू व मोठ्ठा सरदार म्हणून दत्ताजी शिंदे यास लेखकाने वाचकासमोर आणले आहे. 'बचेंगे तो और भी लढेंगे' या एकाच बाणेदार उत्तराने मराठ्यांच्या इतिहासात अजरामर झालेला एक प्रभावी सेनानी म्हणून त्याचे व्यक्तिमत्वाचे पैलू पाटील यांनी पूर्ण ताकदीने साकारले आहेत. अगदी मृत्यू समोर दिसत असतानाही लढण्याची भाषा करणारा हा महावीर विश्वास पाटील यांना आव्हाण देणारा होता. परंतु योग्य अभ्यास व कल्पनाशक्ती यांच्या समन्वयातून दत्ताजीची व्यक्तिरेखा इतिहास पुरुषांना साजेशी दाखविली आहे दत्ताजीचा वीरपणा व तडफदारपणा दाखवितानाच घरगुती प्रसंगातील त्याचा हळवेपणा व चुकीबद्दल पश्चात्ताप करण्याचा स्वभाव अगदी बारीक सारीक प्रसंगातून पाटील यांनी कादंबरीतून दाखविला आहे.

**विश्वासराव (पेशवे पुत्र) –**

विश्वासराव यांचे एक शालिन रुपसंपन्न व्यक्तिमत्व विश्वास पाटील यांनी वाचकासमोर उभे केले आहे. 'दख्खन देशी पुरुषात सुंदर विश्वासराव तर स्त्रियांत सुंदर मस्तानी' अशी वाक्ये शत्रूपक्षाकडे घालून पाटील यांनी विश्वासरावांच्या सौंदर्याची प्रचिती वाचकाला करुन दिली आहे. अनेक प्रसंगातून विश्वासरावांच्या ठिकाणचा धाडसीपणा व हळवेपणा पाटील यांनी दाखविला आहे. मात्र विश्वासरावांबरोबर पानिपत मोहिमेत त्यांची पत्नी होती की नव्हती? या गूढ प्रश्नाने विश्वासराव यांच्या व्यक्तिमत्वाचे अनेक धागेदोरे लेखकाला उलगडून दाखविता आलेले नाहीत. विश्वासरावांबरोबर त्यांच्या पत्नी (लक्ष्मीबाई) बरोबर होत्या हे गृहीत धरले असते तर नवयौवनातील एका प्रेमीयुगुलांचे मृत्यूच्या दारातील फुलणारे गुलाबी स्वप्न लेखकाला फुलविता आले असते. लक्ष्मीबाई बरोबर नव्हती असे गृहीत धारल्यास पानिपत मोहिमेवर निघाल्यापासून ते युद्धासमाप्तीपर्यंतच्या कालावधीतील दोन जीवांची

ताटातूट दाखवून विरहव्यथा एका उच्चतम पातळीपर्यंत दाखविता आली असती. मात्र यापैकी कोणताच भाग कादंबरीत न आल्याने विश्वासरावांचे व्यक्तिचित्र एकांगी झाल्यासारखे वाटते.

**इब्राहिमखान गारदी –**

फ्रेंच चमूत तयार झालेला आधुनिक युद्धाचा पुरस्कर्ता. भाऊसाहेबांना दिलेले इमान पाळण्याकरिता युद्धात हसतमुखाने हौतात्म्य पत्करणारा, एक शूर सेनानी म्हणून त्याचे चित्र उभे राहते. ज्याच्या तोफावर व बंदुकधारी गारद्यावर विश्वास ठेऊन भाऊसाहेबांनी अब्दालीशी शेवटपर्यंत झुंज दिली असा एक सेनानी, अब्दालीच्या रुपाने समोर मृत्यू असतानाही काबुल–कंदाहारवर विजय मिळवून भाऊचे स्वप्न पूर्ण करु पाहणारा एक सच्चा साथी, म्हणून तो वाचकांच्या मनात कायम घर करुन राहतो. अनेक अमिषे उष्ट्या पत्रावळीसारखे दूर सारणारा, आपल्या प्रचंड तोफखान्याच्या साहय्याने कुंजपुरा व दिल्ली ताब्यात घेणारा इब्राहिमखान, आपला जावई व सख्खा भाऊ युद्धात मरण पावला तरी त्याची फिकिर न करता भाऊसाहेबांच्या खुशालीची वार्ता विचारणारा, गोलाच्या लढाईचे तंत्र सांगून फौजेत अन्न धान्याची टंचाई असतानाही आपल्या गारद्यांना शांत करणारा इब्राहिमखान, अशा अनेक घटना व प्रसंगातून इब्राहिमखानाच्या व्यक्तिमत्वावर प्रकाश पडतो. इब्राहिमखानची व्यक्तिरेखा प्रभावीपणे साकार झाल्याने अनेक घटनातून वीर रस ओथंबून वाहत असल्याचे जाणवते.

**जनकोजी शिंदे :–**

पानिपतच्या युद्धात अनेक मराठा वीर धारातीर्थी पडले. त्यात प्रामुख्याने जनकोजी शिंदे याचा समावेश होतो. बुराडी घाटावर दत्ताजी शिंदे मारला गेल्यावर शिंदे फौजेची मुख्यसूत्रे जनकोजीच्या हातात आली. जनकोजीच्या नेतृत्वाखाली प्रमुख तीन उपयुद्धे झाली. यात प्रामुख्याने कुंजपुरावरील हल्ला, अब्दालीचा सेनापती जहॉनखान याच्यावरील हल्ला व प्रत्यक्ष १४ जानेवारी १७६१ ला झालेला मुख्य

संग्राम. या तिन्ही युद्धातून जनकोजीच्या ठिकाणी असणारे शौर्य दिसून येते. जहॉनखानवर त्याने अचानक हल्ला करुन त्याला कोंडित पकडले तर पानिपतच्या युद्धात अवघ्या ५० सैन्यासह त्याने शेवटपर्यंत झुंज दिली. या घटनातून जनकोजीच्या ठिकाणी असणारे स्वामिनिष्ठ व शौर्याचे रुप पाटील यांनी उलगडून दाखविले आहे. तारुण्याने भारलेल्या जनकोजीच्यात देशाभिमान मोठा आहे. परकीय शत्रूला देशातून घालविण्यासाठी जीवावर उदार होऊन प्राणपणाने लढण्याचे त्याच्यात सामर्थ्य आहे. तरुणपिढीची सारी वैशिष्ठे जनकोजीच्या रुपाने वाचकांसमोर येतात.

**मल्हारराव होळकर :–**

उत्तरेतील एक प्रमुख मराठा सरदार म्हणून वाचकासमोर येतात. सर्वात जुने व अनुभवी सरदार आहेत. रघुनाथराव दादा यांच्या उत्तर मोहिमेत त्यांनी प्रामुख्याने सहभागी होऊन उत्तरेतील संपूर्ण भाग तुडविणारे व युद्धानंतरही जिवंत राहणारे एकमेव मल्हारराव होते. कुंभेरीच्या वेढ्यात एकुलत्या एक मुलाचा मृत्यू झाल्यानंतर 'कुंभेरीची माती खणून यमुनेत टाकीन, तरच बापापोटी जन्म घेतल्याचे सार्थक नाही तरी प्राण त्याग करीन' अशी शपथ घेणारा तर दुसऱ्या बाजूला 'नजीबाचा काटा निघाल्यावर पेशवे धोतरे बडवायला सुद्धा ठेवणारा नाहीत' असा कानमंत्र दत्ताजीला देऊन नजीबास सोडविणारा मल्हारबा या दोन्ही घटनेतून दोन भिन्न पातळीतून होळकरांचे व्यक्तिचित्र उभे राहते. कादंबरीत चाळीसच्यावर व्यक्तिरेखा असल्या तरी प्रत्येक व्यक्तिरेखा आपल्या परीने स्वतंत्र अस्तित्व निर्माण करते याचे मल्हारराव होळकर हे उत्तम उदाहरण होय. ऐन लढाईच्या वेळी युद्धाचे पारडे शत्रूपक्षाच्या बाजूला झुकलेले पाहून माघार घेणारे मल्हारबा व गोलाईच्या लढाईत कडकडून विरोध करुन 'गनिमा कावा' चा पुरस्कार करणारे मल्हारबा यांच्यातून एक जुनी पिढीच विश्वास पाटील यांनी वाचकांसमोर उभी केली आहे. जुन्या पिढीची सारी वैशिष्टये मल्हारबाच्या रुपाने त्यानी रंगविली आहेत. अनेक घटना प्रसंगातून व विशेषतः

सल्लामसलतीच्या वेळी घडलेल्या प्रसंगातून मल्हारराव होळकरांचे जीवन व्यवहार व मनोव्यापारांचे सूक्ष्मपणे दर्शन घडविले आहे.

**सुजाउद्दौला :–**

दहा हजार गुप्तहेर बाळगून अयोध्येचे नबाब म्हणून उत्तर हिंदुस्थानात स्वतंत्र राज्य करणारा सुजाउद्दौला हा एक राजा आहे. अब्दालीच्या विरोधात मराठ्यांची बाजू घेऊ पाहणारा सुजा, अब्दालीच्या आक्रमणाला भिऊन व नजीबखानाच्या मायावी धर्माच्या चालीला भुलून अब्दालीस मिळतो. मात्र मराठ्यांचा व अब्दालीचा तह घडवून आणण्याचे जातीने प्रयत्न करतो. त्याच्या या प्रयत्नाला नजीबाचा अडथळा निर्माण होतो. शेवटपर्यंत तह करण्याचे प्रयत्न त्यांचे असफल होतात. युद्धानंतर लाखो रुपयांची खंडणी अब्दालीस देऊन युद्धात पकडलेल्या मराठी स्त्री–पुरुषांना तो सोडतो. तर युद्धात मरण पावलेल्या प्रमुख मराठे सरदारांवर अग्निसंस्कार करतो. यातून मराठ्याविषयी असणारे प्रेम, जिव्हाळा व्यक्त झाला आहे. ऐन युद्धाच्या वेळी मराठ्यास मिळावे ही त्याची तमन्ना शेवटी मृगजळच राहते. शिया आणि सुन्नीचे धार्मिक प्रसंगातून सुजाउद्दौलाचे मन उघडे करुन दाखविण्यात कादंबरीकार यशस्वी झाले आहे. मुळात कादंबरी घटनाप्रधान असल्याने व्यक्तिचित्रापेक्षा घटना अधिक उठावदार होण्याकडे कादंबरीकाराने लक्ष दिले आहे.

**सुरजमल जाट :–**

मराठ्यांना साथ देणारा उत्तरेतील एकमेव राजा आहे. दिल्लीची सत्ता आपल्या ताब्यात राहावी यासाठी तो कायम प्रयत्नशील राहतो. शिंदे होळकरांचे कारभारी हाताशी घेऊन दिल्लीचा बंदोबस्त व आग्र्याचा किल्ला ताब्यात घेण्याचे कारस्थान तो रचतो. मात्र भाऊसाहेबांच्या कर्तव्यदक्षतेमुळे उघड

होते. 'दिवान–इ–खासचे' तख्त काढताना भाऊवर रागावून निघून जाणारा जाट ऐनवेळी युद्धातील जखमी व पळून येणाऱ्या सैन्याना आशेचा किरण वाटतो.

## ▪ गौण किंवा दुय्यम व्यक्तिरेखा :–

मुख्य व्यक्तिरेखांची खुलावट अधिक स्पष्ट होण्यासाठी कादंबरीत दुय्यम व्यक्तिरेखा विश्वास पाटील यांनी अधिक ठसठशीत रंगविल्या आहेत. मुख्य व्यक्तीच्या स्वभावावर प्रकाश टाकण्यासाठीच दुय्यम किंवा गौण पात्रांचा उपयोग होतो. त्यामुळे कादंबरी ही व्यक्तिगत कुणा एकाची न राहता सर्व सामान्य जनांची कथा बनते. ''पानिपत'' कादंबरीत चाळीसच्यावर दुय्यम पात्रे आहेत. यात प्रामुख्याने समशेर बहाद्दर, बळवंतराव मेहेंदळे, गोविंदपंत बुंदेले, नाना फडणीस, नारो शंकर, बापूजी हिंगणे, सखाराम बापू, अंताजी माणकेश्वर, पाराशर दादाजी वाघ, विठ्ठल शिवदेव विंचूरकर, जानु भिंताडा, गंगोबातात्या, रामजी पंत, यशवंतराव पवार आदी मराठ्यांकडील व्यक्तिरेखा आल्या आहेत. विरोधी बाजूमध्ये अब्दालीचा वजीर शहावलीखान, सेनापती जहॉनखान, शहापसंदखान, बरकुरदारखान, रेहमतखान बरकझाई, हाफिज रहमतखान, वजीर गाजीउद्दीनखान, अताईखान, कुतुबशहा, काशिराज पंडित आदी व्यक्तिरेखा बरोबर अन्य व्यक्तीरेखा आल्या आहेत.

विस्तारभयामुळे सर्वच व्यक्तीरेखांची नावे देण्याचे टाळले आहे. मुख्य घटनेतील उपकथानक, श्रद्धा, अंधश्रद्धा, धार्मिक विधी, युद्धातील लहानमोठे प्रसंग व अन्य कारणासाठी या पात्रांची योजकता आलेली आहे. कादंबरीचे कथानक सुसंगत, बांधेसूद व आकर्षक बनविण्यासाठी कादंबरीकार या पात्रांची योजना करीत असतो. त्यामुळे कादंबरीतील समाजजीवन प्रत्ययकारी बनविणे त्यास सोपे जाते.

## ■ स्त्री व्यक्तिरेखा :–

आजवरच्या अनेक ऐतिहासिक कादंबरीतून लढाया, कटकारस्थाने, राजकारण इत्यादी प्रकारच्या हकिकतीतून अथवा केवळ शृंगारात्मक प्रेमप्रसंग साजरे करण्याकरीता स्त्रिया आल्या आहेत. मात्र पानिपतकाराने असली इष्कबाजी कटाक्षाने टाळून तत्कालीन परिस्थितीचे आव्हान पेलणाऱ्या कर्तव्यकठोर स्त्रियांची अत्यंत उदात्त अशा प्रकारची व्यक्तिचित्रणे साकार केली आहेत. भागिरथीबाई, पार्वतीबाई, गोपिकाबाई, बळवंतरराव मेहेंदळेंची पत्नी, मलिकाजमानी या स्त्रिया तत्कालीन काळाच्या प्रतिनिधी म्हणून कादंबरीकाराने उभ्या केल्या आहेत.

पार्वतीबाईच्या रुपाने सद्वर्तनी, धर्मनिष्ठ व पतीवरील निष्ठा कायम बाळगणारी स्त्री उभी केली आहे. प्रसंगी अब्रू रक्षणासाठी बाळगलेली जागरुकता धाडस व शस्त्र चालविण्याइतका निर्भयपणा पार्वतीबाईच्या अंगी आहे.

दत्ताजीच्या मृत्यूनंतर जखमी जनकोजीची भेट झाल्यावर दुःखाचा आलेला उभाडा विषासारखा घोटून ''बाबा तू रांडसारखा रडतोस काय?'' आशा करारी बाण्याने जनकोजीस क्षात्रधर्माची जाणीव करुण देणारी भागिरथीबाई काय! किंवा अगदी लहान वयातही मोठ्या आणिबाणीच्या प्रसंगी पोक्तपणाने योग्य निर्णय घेणारी काशीबाई काय? दोन्ही व्यक्तिरेखा एक उच्चतम पातळी गाठतात.

मल्हारराव होळकर यांनी सुरजमल जाट याचा शिरच्छेद करीन अशी प्रतिज्ञा केल्यावर दत्ताजी शिंदे याचे पगडभाईपण स्विकारण्यास लावणारी जाट राजाची पत्नी अनसूया, दत्ताजी नजीबाला भेटण्यास तयार झाल्यावर त्याची कानउघाडणी करुन नजीबखानाचा काटा काढणाऱ्या मंडळीत सहभागी होणारी भागिरथी, पती लढाईस चालला त्यावेळी त्याच्या क्षात्रधर्माला प्रोत्साहन देऊन त्यांच्या निधनानंतर अत्यंत धीरगंभीरपणे सगळे मायामोह निष्ठूरपणे दूर सारुन पतीबरोबर सती जाणारी बळवंतराव मेहेंदळे यांची पत्नी, या साऱ्या मराठमोळ्या स्त्रिया एक आदर्श उभा करतात.

'मुसलमानीस तांबेरा आला' म्हणून कारस्थाने करण्यास सिद्ध झालेली मलिकाज्मानी, गोपिकाबाई तर मुत्सुद्देगिरी व राजकारणांतील स्त्रियांचा सहभाग यांचे प्रातिनिधीक स्वरुप म्हणून भेटते. कादंबरीत स्त्री पात्रे कारणापुरती आली असली तरी आपल्या वर्तनाने प्रत्येक स्त्रियांचा स्वतंत्र ठसा कादंबरीत उमटला आहे.

## ■ भाषाशैली :–

''एखादया द्रव्याला विशिष्ठ माध्यमाद्वारे विशिष्ठ रुपामध्ये प्रकट करण्याकरीता वापरल्या जाणाऱ्या तंत्र समुच्चयाची पद्धती म्हणजे शैली.''[८] अशी शैलीची व्याख्या भालचंद्र नेमाडे यांनी केली आहे. प्रत्येक लेखाकाची स्वतंत्र शैली असते. किंबहुना प्रत्येक लेखक आपली एक विशिष्ठ शैली घेऊनच जन्माला येतो. लेखक ज्या विशिष्ठ काळातील चित्रण करीत असतो त्यासाठी तत्कालीन काळातील भाषेचा उपयोग त्याला करावा लागतो. ''पानिपत'' ही पेशवेकालीन कादंबरी असल्याने पेशवेकाळालीन भाषेचा वैशिष्ट्यपूर्ण ढंग कादंबरीत दिसून येतो. प्रसंगी हिंदी, संस्कृत भाषेबरोबर पात्रांच्या तोंडी इंग्रजी शब्द व आधुनिक भाषा दिसून येते.

उदा. पेशव्यांना उद्देशून गोपिकाबाई म्हणतात – ''तुम्ही एकटे फुटलेले धारण कवेत घेणार?'' (पृ. ४९४) अशी आधुनिक भाषा आली आहे. याचबरोबर सुभेदार ऐवजी राज्यपाल, लोकनिर्णय, राजमुद्रांकित कागद, विषारी प्रचाराचा धडाका, आर्थिक आणि राजनीतीचे सवाल, मध्यवर्ती सत्तेचे सोयरसुतक वगैरे स्वातंत्र्योत्तर काळातील शब्द आले आहेत.

पानिपत युद्धापूर्वीच दोन तीन वर्षे अगोदर इंग्रजानी बंगालात पाय ठेवला होता तरीही फूट, फर्लांग, मैल, रग, कोट, जाकीट आदी शब्द आलेले आहेत. म्हणून कादंबरीच्या भाषेविषयी अभिप्राय नोंदविताना विद्या सप्रे म्हणतात – ''मुसलमानांच्या तोंडी शुद्ध संस्कृतप्रचुर वाक्यं आणि पेशव्यांच्या ब्राह्मणी स्त्रियांच्या तोंडी 'मुडदा, माती आड होणे, वाईट वंगाळ बोलणे असली शब्द शैली.''[९] तर के. डी.

नाईक म्हणतात– ''ऐतिहासिक भाषा पानिपतकारांनी आत्मसात केल्याचे कादंबरी वाचताना जाणवत नाही. पानिपत कादंबरी स्वयंस्फूर्तीने लिहूनदेखील लेखक कादंबरीत जिवंतपणा आणू शकले नाहीत. पानिपत कादंबरी वाचकांच्या मनाची पकड सुरुवातीपासून शेवटपर्यंत घेऊ शकत नाही. कुठचाही प्रसंग ते जिवंतपणे चितारु शकले नाहीत. त्यांची मराठी लेखनशैली उठावदार नाही आणि ऐतिहासिक मराठी भाषेचा कादंबरीत अभाव आहे.''[१०]

कादंबरीची भाषा कृत्रिम व खोटी वाटू नये यासाठी विश्वास पाटील यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले असले तरी ''पानिपत''ची भाषा आधुनिक असल्याचे ते मान्य करतात. ''मी जे लिहलं, ते वाचकांपर्यंत पोहोचावं असं मला वाटतं. त्यादृष्टीने समकालीन शब्द कादंबरीत येणे क्रमप्राप्तच होते.''[११] असे पाटील म्हणतात.

प्रत्येक लेखकाची स्वतंत्र लेखनशैली असते त्यामुळे ''पानिपत''च्या लेखनात पाटील यांच्या भाषेचे गुणविशेष दिसणे शक्य आहे. ''पानिपत''ची भाषा आधुनिक असली तरी भावपूर्ण, चित्रदर्शी आहे. भाऊसाहेब, नानासाहेब व इतर मराठे सरदाराप्रमाणे अफगाण सरदारांचीही भाषा मराठी आली आहे. त्यामुळे संपूर्ण कादंबरीची भाषा आधुनिक झाली आहे.

उदा. सलुखाच्या बातचीतवेळी नजीबखान व शहावली यांच्यात मतभेद होतो तेंव्हा रागावलेला शहावली नजीबास उद्देशून म्हणतो– ''बेवकूफ ! बदमाशा !! प्यादयाचा फर्जी झाला म्हणून मर्जील येईल त्या बाता करतोस? थांब तुला जाग्यावर उभा चिरतो! जिहादची झूट भाषा बोलून तू आलमपन्हॉच्या डोळ्यात धूळ फेकतोस? तुझ्या मायावी रुपाला मी भुलणारा नाही. जेंव्हा बादशहावर संकटाचे पर्वत कोसळतील तेंव्हा त्याच्या अश्वाचा लगाम धरीत हाच शहावली काट्याकुट्यातून मार्ग काढील. तू नव्हेस! विजयाच्या मिरवणुकीत ताशाकर्ण्यावर नाचणारा मर्कट तू! तुला शहाचे हित काय आणि अहित काय? तुझं उघडंनागडं रुप मी जाणतो म्हणून तू माझ्यावर जळतोस काय?'' अशी पूर्णपणे मराठी भाषा आली आहे.

मराठी भाषेबरोबरच शहावली, अब्दाली, नजीब, सुजा व अन्य त्यांचे सरदार हिंदी भाषेतून ही बोलताना दिसून येतात.

लेखक ज्या प्रदेशातून आला आहे त्या प्रदेशाची तो भाषा बरोबर घेऊन येतो. विश्वास पाटील यांच्या भाषेला शिराळा–कोल्हापूर कडील ग्रामीण भाषाशैलीचा बाज आहे. उदा. ''तटबंदीला दुसण्या देऊन मराठे दिल्लीत घुसले.''

अब्दाली येत आहे व त्याचा पराक्रम मोठा आहे याची आठवण नारोशंकरांनी करुन दिल्यावर दत्ताजी शिंदे म्हणतात ''तो कच्चा नसला तरी कच्चा श्वापदासारखा त्याला फाडून खाईन, कच्चं मांसच जास्त चवदार असतं.'' (पृ.४३)

तर मल्हाररावांच्या तोंडी – ''आता त्या अब्दुल्याला मी सोडणार नाही, त्याला कोंबड्यागत उभा सोलीन आणि त्याच्या कातडीत पेंढा भरुन त्याला वेशीवर लटकवीन तरच खुटेकरांची अवलाद सांगेन.'' (पृ. ६२)

कादंबरीत क्वचित प्रसंगी काव्यमय वाक्यरचना आली आहे. उदा. ''इकडचा स्वभाव... एवढेसे मनाला लागले की काळ्या ढगासारखे गदगदून जातात'', ''एकूण काय दिल्ली ही त्या दख्खनी मराठ्यांना गुलाबकावलीच्या फुलासारखी दूर राहिली आहे.'' (पृ.१९७)

''एकदाच काय पण हजारदा दिल्लीचं तख्त दोन्ही हातात धरुन गदागदा हालविण्याचे सामर्थ्य मराठी मातीत होतं... आहे पण आमची लाचारी, आमच्यातली लाथाळी, भाऊबंदकी, गद्दारी, हुजरेगिरी, स्वाभिमानाच्या नावाखाली प्रत्यही आढळणारा बोटचेपेपणा, परधार्जिणता या आपल्या दोषांमुळे अनेकदा दिल्ली जवळ येऊनही आमच्या करिता कायमची दूर राहिली आहे... राहिलं!'' (पृ.१९५)

भाऊसाहेब उत्तर मोहिमेवर निघाल्यानंतर वाटेत येणाऱ्या अडचणी तपशीलवार सांगितल्याने कादंबरी थोडी पाल्हाळीक वाटते मात्र, पाल्हाळाने ऐतिहासिक वास्तवाचेच अधिक विस्तृत चित्रण झाले असल्याचा प्रत्यय येतो. कादंबरीतील लहानमोठे घटनाप्रसंग साक्षात उभे करण्याचे सामर्थ्य पाटील यांच्या

भाषेत आहे. म्हणून शंकर सारडा म्हणतात – ''पानिपत ही महाकाव्याच्या तोलामोलाची कादंबरी, बानकशी ऐतिहासिक कलाकृती लेखकाची सर्वसाक्षी उपस्थिती, दोन्ही बाजूंची तुल्यबळ पेशकश, समग्र मानवी अस्तित्वाचे गुढ भवितव्याचे भान देणारी उदात्त अतिमनुश मुल्ये उद्‌घोषित करणारी कालस्वराची नेमकी लय पकडणारी भव्य अनुभूती वाटते.''[१२]

इतिहासातील पात्रे, प्रसंग पाटील यांच्या भाषेने वर्तमानात आणून ठेवल्याने ती पात्रे, प्रसंग, घटना आपल्या वाटतात. घटना आपल्यासमोर घडत असल्याची जाणीव होते. भाषा ऐतिहासिक नसली तरी तत्कालीन वातावरण निर्मितीस पोषक आहे. कादंबरीतील प्रत्येक घटना प्रसंगाशी व सुख दुःखाशी वाचक एकरुप होतो. म्हणूनच वाचकाच्या हृदयाला हात घालण्याचे अकृत्रिम सामर्थ्य तिच्यात आहे हे मान्य करावेच लागते.

## ■ निवेदनपद्धती :–

ऐतिहासिक कादंबरीचा उद्देश ऐतिहासिक सत्य घटनेला कल्पनेची जोड देऊन एका नव्या कलाकृतीची निर्मिती करण्याचा असतो. ही निर्मिती करण्यामागे त्याचा कोणता ना कोणता उद्देश असतो. कथानकाची वैशिष्ट्यपूर्ण मांडणी करीत असताना आपल्या जीवनाविषयीच्या कल्पना आणि प्रतिक्रिया तो व्यक्त करीत असतो. आपली कथा, कादंबरी शक्य तितकी आकर्षक व परिणामकारक होण्यासाठी तो खास स्वतंत्र अशी निवेदनपद्धती वापरतो. कथानक चित्तवर्धक व परिणामकारक करण्यासाठी विशिष्ठ अशा एकाच पद्धतीचा वापर करण्याची लेखकाला गरज नसते. आपल्या कथानकाला अनुरुप अशी निवेदनपद्धती लेखकाने स्वतःच शोधावयाची असते. या संदर्भात दि.के. बेडेकर म्हणतात– ''कादंबरीकाराची भूमिका अमुकच हवी असे नाही. कोणतीही असो, तिने वाचकांच्या मनाची रचना ढळली पाहिजे.'' [१३]

ऐतिहासिक कादंबरीच्या संदर्भात लेखक व कथाबीज यांच्यात काळाच्या दृष्टीने खूप फरक असतो. हा फरक नष्ट होऊन भूतकाळातील घटनांविषयीचे त्याचे कुतूहल पूर्ण होईल अशीच निवेदनपद्धती ऐतिहासिक कादंबरीकाराला वापरावी लागते. कादंबरीचा लेखक भूतकाळातील घटनांची निर्मिती करीत प्रत्येक संवादातून अथवा घटना–प्रसंगाच्या चित्रणातून वाचकांच्या मनात या घटना प्रत्यक्ष घडत आहेत असाच आभास निर्माण करीत असतो. जेंव्हा निवेदक निरीक्षकाची भूमिका स्विकारुन घटना प्रसंगाचे निवेदन करतो, तेंव्हा ते निवेदन प्रत्ययकारी होते. तिथे निवेदकाची भूमिका महत्वाची असते.

निवेदनातून कादंबरीकार आपले विचार प्रकट करीत असतो. आत्मनिवेदन पद्धतीमुळे आणि जीवनसंघार्षातील वेगवेगळे दृष्टीकोन दाखविल्यामुळे त्या घटनेसंबंधीच्या लेखकाच्या प्रतिक्रिया कळतात, परिणामी कथानक उद्‌बोधक वाटते. तर पात्रमुखी निवेदन पद्धती स्विकारुन लेखक आपण पत्रांशी एकरुप झालो आहोत हे वाचकांना भासविण्याचा प्रयत्न करतो.

पाटील यांची वर्णन शैली प्रसंगपरत्वे नानाविध भूमिका घेते. कधी ती सरळ साध्या पद्धतीने निवेदन करते तर कधी संवादमय होऊन प्रसंगातील नाट्य उभे करते

उदा. – ''विठ्ठलपंत, काढा तंबाखु.'' घोड्याच्या पाठीवर मस्तीने थाप मारीत मल्हारराव बोलले.

''कुठे निघालात मल्हारी?''

''जातो जरा शिकारीला बऱ्याच दिसांत तोंडाला बांभळी आली आहे. बघतो काही गवसते का?''

तंबाखू मळतामळता मल्हारराव विंचूरकरांचा गोट निरखू लागले. मागच्या अंगाला त्यांनी दोन–अडीच हजार अफगाण बघितले. मल्हारराव हसून विचारु लागले,

''विठ्ठलपंत ऽ खोगीरभरती कुठली बाबा?''

''ही कुंजपुऱ्यात आपल्या आसऱ्याला आलेली अफगाणाची पोरे. करतील कष्ट आणि खातील ह्या तरी बिचाऱ्यांनी कुठे जायचे?''

''विठ्ठलपंत S बघा बरं, नाही तर ऐन युद्धाच्या वख्ताला ही काळतोंडी आपली आहेत की गिलच्यांची ते ओळखायचे नाही.''

''करु काहीतरी व्यवस्था. डोक्याला फडकेबिडके बांधू.'' (पृ.३७६)

या संवादातून कमी शब्दात नेमके नाट्य उभे राहते.

कथानकाचे निवेदन सहज परंतु उत्साहवर्धक व्हावे म्हणून ज्योतिषांचे भविष्यकथन, नदया–नाले, किल्ले यांची सविस्तर वर्णने, पठाणांच्या लुटीच्या हकिकती दोन्ही पक्षात होणारा वरचढपणा व पाटील यांनी केलेली कलात्मक मांडणी यामुळे घटना उठावदार झाल्या आहेत.

- **वर्णनशैली :–**

ऐतिहासिक कादंबरीप्रवाहातील आपटे, नाथमाधव, हडप इत्यादी लेखकांच्या कादंबऱ्यातून येणारी पाल्हाळीकता ''पानिपत'' मध्ये नाही. प्रसंगानुरुप योग्य शब्दातील आटोपशीर पण प्रभावी वर्णन हे ''पानिपत''चे खास वैशिष्ट्य आहे. पानिपतच्या युद्धाचा कालावधी इतक्या विलक्षण, वेधकतेने आणि सामर्थ्याने पाटील यांनी वाचकापुढे उभा केला आहे की, त्यांच्या वर्णनशैलीचे जेवढे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे.

''पानिपत''ची भाषा ऐतिहासिक नसली तरी ''पानिपत'' मधील वर्णनशैली ऐतिहासिक वातावरण निर्माण करणारी आहे. पेशवाईतील रितीरिवाज, सणसमारंभ, पोशाख, मिरवणुकी, मेणे, लढाया, पेशवाईचे खास संस्कार आदींचे प्रतिबिंब ''पानिपत'' मध्ये पडलेले आहे. उदा. ''जव्हेरगंज हा शिंदयांचा आवडता हत्ती जयाप्पा शिंदयांना हा हत्ती माळव्याच्या डोंगरात मिळाला होता. काळाकभिन्न जव्हेरगंज चालला की रस्त्यावरुन कातळाचा कडाच सरकतोय की काय असं बघणाऱ्याला वाटायचं. कूच करताना राजाराम माहूत जव्हेरगंजला भल्या पहाटे उठून सजवायचा बोहल्यावर चढणाऱ्या मुलीच्या हातापायावर फुरसतीने बारीक मेंदी गोंदावी, तसेच शिंदे जव्हेरगंजला सावकाशीनं सजवायचे. त्याच्या

पाठीवरचा किनखापी पाखरा सर्वात उठून दिसायचा. गळ्यातील सोन्या–रुप्याच्या घांटा दमदार पावलाबरोबर बारीक नाद धरायच्या. रुप्याच्या पत्र्यांनी सजवलेली अंबारी सूर्यप्रकाशात चमकायची. राजाराम माहूतसुद्धा सजलेला असायचा त्याच्या शिरीची पिळदार शिंदेशाही पगडी खुलून दिसायची. अंबारीत सज्ज झालेले जनकोजी आणि दत्ताजी सर्वांना कृष्णअर्जुनासारखे भासायचे. खाजगीतल्या स्त्रिया बुरख्याच्या गाड्यांतून पालखी आणि खाशा मेण्यातून प्रवास करायच्या.'' (पृ.२२)

किंवा

''साहेबी नौबत वाजू लागली. त्यासरसे डंकेही वाजू लागले. तुताऱ्या आभाळभेदी आवाज काढू लागल्या. साऱ्या छावणीत हलकल्लोळ माजला. ''चला उठा SS, युद्धाची तयारी करा'' आरोळ्यानी छावणी भरुन गेली. शिपाईगडी उत्साहाने नाचू लागले. खुंट्यांना अनेक दिवस बांधलेली घोडी सुटली. त्यांच्या पाठीवर जीन चढताच ती हुशार होऊन अंग झाडू लागली. उंट आळोखेपिळोखे देत उभे राहिले. डोईला पगड्या बांधून, भरदार झगा घातलेले शिलेदार कमरेला दाब बांधू लागले. तलवारी म्यानाबाहेर पडल्या. कोवळ्या सुर्यप्रकाशात चमकू लागल्या. भाले डोकी वर काढून नाचू लागले. नौबती डंके आणि तुताऱ्यांनी सारा आसमंत दणाणून गेला.'' (पृ.११)

अशी सहजसुंदर ऐतिहासिक वर्णने मराठी कादंबरीत तुरळकच आढळतील. नानासाहेब पेशव्याचा मृत्यू तर हृदयस्पर्शी व वाचकाला हळहळायला लावणारा आहे.

''अंतकाळ जवळ आला, श्रीमंत पडल्या स्थितीतून जीवाच्या जोराने उठण्याचा आटोकाट प्रयत्न करु लागले. त्यांनी कशीबशी उठून रघुनाथदादांना आवेगाने कडाडून मिठी मारली आणि किंचाळून ओरडले भाऊ S भाऊ SS...''

श्रीमंतांच्या हाका अंधार चिरीत गेल्या

मान गळून रघुनाथरावांच्या मांडीवर पडली

वाडा गर्जून उठला

पर्वती थराली

श्रीमंतांना कालगती लाभली!'' (पृ.५२०)

कादंबरीतील हे वर्णन विश्वास पाटील यांच्या उत्तम वर्णन शैलीचा सर्वोत्तम नमुना आहे. या वर्णनाने कादंबरी हळूहळू भावनिकतेच्या पातळीवर शिखर गाठते. म्हणून तर मुरलीधर सायनेकर १९८८ मधील मराठी कादंबरीचा आढावा घेताना ''पानिपत'' विषयी म्हणतात – ''१९८८ मधील कादंबरीच्या जमेच्या बाजूचा विचार करता ज्या थोड्या कादंबऱ्यांचा आवर्जून उल्लेख केला त्यापैकी एक महत्वपूर्ण कादंबरी म्हणजे विश्वास पाटील यांची ''पानिपत'' ही कादंबरी होय.''[१४]

युद्धाची, प्रवासाची व मराठ्यांच्या हलाखीची विस्तृत वर्णने हा या कादंबरीचा महत्वाचा विशेष होय. लढाईच्या वेळी सैन्याला अवेश येणाऱ्या केलेल्या भाषणांतून वीररसांचा प्रत्यय येतो. युद्धातील पराभवानंतर आलेली कत्तलीची वर्णने भयानक रसात तर मराठा वीरांचा मृत्यू करुण रसात परिमित झाला आहे. मराठी सैन्याची पळपुटी वृत्ती व शौर्यपरंपरा, आपआपसातील वैरभाव, मराठमोळ्या सरदारांतील दुजाभाव, गर्विष्ठपणा, मुत्सुद्देगिरीचा अभाव याच्यावर कादंबरीकार जणू तुटून पडतो. भाऊसाहेब व नजीबखान यांचे चित्र रेखाटताना पाटील यांच्या लेखनिला प्रखर धार चढते. याशिवाय भाविकश्रद्धा, तीर्थयात्रा, स्नानदाने, दैववाद, दैवी आपत्ती, शकुन–अपशकुन यावरचा विश्वास इत्यादी, सामाजिक चालीरीतींची वर्णने पेशव्यांच्या अंतगृहातील गृहकलहांची त्यांनी नेमकी पकडलेली नस, प्रत्यक्ष युद्धभूमीवर घडत असलेल्या नाट्याधारे त्यांनी साधलेली खुलावट इत्यादी बारीक–सारिक वर्णनावरुन त्यांच्या सूक्ष्मतर अवलोकन शक्तीची कल्पना येते.

## ▪ वातावरण निर्मिती :–

ऐतिहासिक कादंबरीत ऐतिहासिक पार्श्वभूमीचे चित्रण यथायोग्यरित्या केलेले असणे गरजेचे असते. त्यादृष्टीने लेखक लोककथा, लोकगीते, पोवाडे, दंतकथा इत्यादींच्या माध्यमातून तत्कालीन

वातावरणाची पुनर्निर्मिती करीत असतो. केवळ वर्णने लिहून तो तत्कालीन वातावरण निर्मिती करीत नसतो, त्यासाठी कादंबरीत दुय्यम पात्रे, काल्पनिक पात्रे, सण–उत्सव, उपकथानके, रीतीरिवाज, चालण्याबोलण्याच्या पद्धती, श्रद्धा अंधश्रद्धा, शकुन अपशकुन व्यक्त करीत असतो. हे ऐतिहासिक वातावरण कादंबरीतील घटना व व्यक्तिरेखा यांच्याशी सुसंगत स्वरुपाचे असते. त्यातून कादंबरीकार भूतकाळ जिवंत करीत असतो.

विस्कटलेला इतिहास कादंबरीकार व्यक्त करताना अनेकदा मध्यवर्ती व्यक्ती केंद्रबिंदू मानून घटनांची मांडणी करीत असतो. तर कधी घटना केंद्रभूत मानून घटनांच्या संदर्भात पात्रांची निर्मिती करीत असतो. कादंबरीतील एखादा घटनाप्रसंग अधिक–अधिक वास्तव व जिवंत करण्यासाठी ऐतिहासिक वातावरणातील सारे घटक त्याला टिपावे लागतात. वातावरणाचा वाचकाच्या मनाशी निकटचा संबंध आहे हे जाणून घेऊन वातावरण कथानकाशी एकजीव करावे लागते. कादंबरीतील घटना ज्या विशिष्ट काळातील आहेत त्या काळाचे भान कादंबरीकाराला ठेवावे लागते. विशिष्ट स्थल, काल व वातावरण समाजमनावर परिणाम करीत असते. विशिष्ट प्रदेशातील लोकांमध्ये प्राचीन संस्कृतीची काही गुणवैशिष्ट्ये आढळून येतात किंवा आलेली असतात. वातावरणाच्या माध्यमातून ती प्रत्ययाला येतात. या संदर्भात सर्वसाधारण वातावरणाच्या दृष्टीने प्रा.स.शि. भावे यांचे विचार महत्वाचे वाटतात. ते म्हणतात– ''ऐतिहासिक, ग्रामीण, प्रादेशिक ही विशेषणे ज्या विशेषांचा उल्लेख करतात ते विशेष स्थल व काल या संदर्भात प्रथम जाणवतात. पण स्थलकालाचा निकष या विशेषासाठी पुरेसा पडत नाही. मग विचार करावा लागतो तो वातावरणाचा. वातावरण हे स्थल–काल विशिष्ट असले तरी स्थलकालबद्ध स्वरुपाचे असेल असे नाही. वातावरण म्हणजे वातावरणाचा जिवंतपणा, वेगळेपणा, हा जिवंतपणा व वेगळेपणा आणि त्याचा स्पंदनशीलकोश हाच खरा कोणत्याही कलाकृतीचा संदर्भ! विशेषणे लागायची तर ती या जिवंत वातावरणाला लागणे योग्य होईल. हे वातावरण सांस्कृतिक विशेष, धर्म, गाव, जात, आर्थिक परिस्थिती,

भौगोलिक परिस्थिती इत्यादी घटकांनी तयार होते. व्यक्ती परिस्थिती व समाज यांच्या द्वंद्वातून हे घटक जिवंत होतात.''[१५]

सर्वसामान्यपणे प्रतिभावंत लेखक भूतकाळाच्या गाभ्यात शिरुन आपल्याला जे सांगायचे आहे तेच स्वतःच्या विधानांनी वर्णनांनी वाचकापर्यंत नेऊन पोहोचवित असतो. त्या दृष्टीने पानिपतकार यशस्वी झाले आहेत. पुण्याचा ऐतिहासिक वाडा, कुंजपुऱ्याचा किल्ला, बुराडीचा घाट, पानिपत गाव, मथुरेतील मंदिरे, गंगा–यमुनेचा प्रदेश याशिवाय मराठ्यांचे सण, उत्सव यांचा सूक्ष्म विचार पानिपतकाराने ''पानिपत'' कादंबरीत केला असल्याचे जाणवते.

उदा.– ''भाऊसाहेब कचेरीच्या डेऱ्याकडे निघाले. तो वाटेत त्यांना यात्रेकरुंचे दोन तीन जथे दिसले, प्रत्येक जथ्यात चारपाचशे यात्रेकरु. त्यात पोरसवदा स्त्रियांपासून ते साठीसत्तरीच्याही माता सहभागी झालेल्या. अनेक गोसावी, बैरागी हातात तीरकमठे, करोटी घेऊन चाललेले. यात्रेकरुंचं सामान वाहण्यासाठी प्रत्येक जथ्यात तीस–चाळीस तट्टं खेचरं आणि भाकड जनावरं दिसत होती. सोबत अनेक वाद्ये, बावटे, भांडीकुंडी साऱ्यांची रेलचेल झाली होती.'' (पृ.१०४)

किंवा

''ताशे, कर्णे, बिगुल, झांजा, डफ, शिंगे, तुताऱ्या यांचा गिल्ला हैदोसदुल्ला उडाला. स्वारबारगिरांच्या पाठीमागे सरदारांच्या अंबाऱ्या चालल्या. मधोमध भाऊसाहेबांचा गजेंद्र चालला होता. त्याच्या अंगावरचा भरजरी पाखरा सुर्यकिरणांत विलक्षण चमकत होता. गळ्यातील सोन्यारुप्याच्या घंटा घाणघाणत होत्या. गजेंद्राच्या मस्तकावरचे नक्षीदार सुवर्णपक्षी विलक्षण सुंदर दिसत होते. सोन्याचा पत्रा मारलेली अंबारी उन्हात झाळा मारीत होती. चारी बाजूंनी कलाबुताचे गोंडे झुलत होते.'' (पृ.२९७)

वरील उदाहरणातून तत्कालीन लोकांचे रीतीरिवाज, पोशाख, सण–समारंभ अचूकपणे टिपल्याने वातावरण अधिक प्रत्ययकारी झाले आहे. अशा प्रकारे योग्य वातावरणाच्या चित्रणातून त्या काळचे स्पंदन विश्वास पाटील यांनी टिपले आहे. याबरोबरच महाल, दरबार लोड तक्यांच्या बैठकी, नाचगाण्याच्या

मैफली, मिरवणुक, दासदासी, हुजरे–मुजरे या साऱ्यांचे सुक्ष्म बारकाव्यासह वर्णन त्यांनी केले आहे. शनिवारवाड्यातील व प्रत्येक युद्धाभूमीवरील अंतर्गत कारस्थाने, खलबते, बैठकीबरोबरच लढाया, तोफखाने, घोडी व त्यांच्या दौडी, ठिकठिकाणच्या छावण्या, वीरश्रीला आव्हान देणारे उत्तेजक स्वरुपी चित्रणही ते करतात. कादंबरीतील अनेक प्रवासवर्णने पाहता त्यांचे बखरीशी असणारे साम्य जाणवते. याबाबत विद्या सप्रे म्हणतात– ''पानिपत कादंबरी रघुनाथरावांचे दक्षिणेत परतणे इथपासून नानासाहेबांच्या मृत्यूपर्यंत उपरोल्लेखित रियासतीची पृष्ठे ३१५ ते ४५० पूर्णपणे समांतर जाते.''[१६] बखरी या इतिहासदृष्ट्या विश्वासार्ह नसल्याने विश्वास पाटील यांनी रियासतकारांना प्रमाणभूत मानले आहे. परंतु, प्रसंगवर्णन करताना बखरकाराप्रमाणे तो प्रसंग हुबेहुब डोळ्यापुढे राहिल असा रेखाटतात.

विश्वास पाटील यांनी पेशवेकालीन म्हणी, पुराणातील दाखले व बोलण्याची पद्धत यांचाही मार्मिकपणे वापर करुन ऐतिहासिक वातावरण निर्मिती केली आहे.

## ▪ पानिपतचे गुणदोष :–

मराठी ऐतिहासिक कादंबरीमध्ये एक महत्वाचा मानदंड ठरावी, अशी ''पानिपत'' कादंबरी आहे. पानिपतच्या युद्धाच्या पराभवाचे अवलोकन करीत असताना मराठी माणसाचे गुण आणि दुर्गुण कादंबरीतून अप्रत्यक्षपणे दाखविले आहेत. इतिहास आणि ललित साहित्य याचा एकजिन्सी उत्तम नमुना म्हणून पाहवे अशी ''पानिपत'' असली तरी अनेक ठिकाणी कादंबरीतील दोषांचा प्रत्यय येतो. सर्वसामान्यपणे आढळून आलेले दोष असे.

१) होळकर नजीबखानास भेटावयास जातात तेंव्हा कडक थंडीचे वर्णन आले आहे. प्रत्यक्ष होळकर नजिबखानाच्या डेऱ्यात जातात तेंव्हा मसलतीच्या वेळी ''नजीबाच्या तोंडावरचे घामाचे थेंब चित्रविचित्र दिसू लागले'' असे वर्णन करतात. या ठिकाणी वर्णनात तफावत जाणवते. (पृ. १०–११)

२) बुराडी युद्धानंतर जनकोजी अनेक जखमांमुळे पृ.५८ वर बेशुद्ध पडला आहे तर पृ.६० वर जनकोजी घटाघटा पाणी पिऊन शुद्धीवर आला. अशी विसंगती आढळते. याचप्रमाणे पृ.क्र.३६४ वर नारो शंकर, पाराशर दादाजी वाघ यांचे जवळ एक लाख पन्नास हजार रुपयांचा खजिना पाठवितो मात्र ''दोन लाखाचा खजिना लुटला'' असे वाक्य पाटील यांनी पृ.क्र. ३७९ वर मल्हारराव होळकर यांच्या तोंडी घातले आहे. थोडक्यात याही ठिकाणच्या वर्णनात विसंगती आढळून येते.

३) अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली तेंव्हा नाणी पाडण्यासाठी भाऊसाहेब पृ.क्र.३८९ वर ''हर सरदारांच्या डेऱ्यापुढून बुट्या पाट्या फिरवा. अबलांच्या गळ्यात जेवढे सुवर्णालंकार असतील ते गोळा करा, दौलतीच्या मालकीच्या वस्तू ही सोडू नका'' असा आदेश काढणारे भाऊसाहेब जेंव्हा युद्धावर निघतात तेंव्हा त्यांच्या हत्तीच्या पायात रुप्याच्या वाक्या आणि गळ्यात सोन्याच्या घंटा असल्याचे वर्णन आलेले आहे.

फौजेत पैशाची व अन्नधान्याची टंचाई होती म्हणून स्त्रियांचे अलंकार गोळा करा म्हणणारे भाऊसाहेब आपल्या हत्तीच्या गळ्यात सोन्याच्या घंटा ठेवतील कशा? असा प्रश्न निर्माण होतो.

४) पृ.४३१-४३२ वर विश्वासरावांच्या भाळावर जंबुऱ्याचा तडाखा बसून कपाळाच्या चिंधडया उडाल्या असे वर्णन आले आहे मात्र विश्वासरावांचा मृतदेह पाहून ''सुभान अल्ला!, वा क्या बात है?'' अशी वाक्ये गिलच्यांच्या तोंडी घालून सौंदर्याचे वर्णन केले आहे. या ठिकाणी विश्वासराव सुंदर होते हे सर्वमान्य आहे परंतु कपाळाच्या चिंधड्या झाल्यावर सौंदर्य अबाधित राहते का? हा प्रश्न उरतोच.

वर्णनात ज्या पद्धतीने विसंगती आढळते त्याप्रमाणे कादंबरीत पुराणकाळातील दाखले देताना पाटील यांच्याकडून चुकीचे संदर्भ दिले गेलेले आहेत.

उदा. पृ.५२० वर ''दादा कुरुक्षेत्रापासून पानिपत हा अगदी जवळचा गाव. कौरव पांडवांचा रणप्रसंग तिथेच घडला'' असे नानासाहेब पेशवे रघुनाथदादांना सांगतात. मात्र कुरुक्षेत्रावर कौरव-पांडवांचे युद्ध झाले असे महाभारत सांगते. पृ.३०६ वर बलेराम पाटील यांच्या तोंडातून

''दुर्योधनाने राजा युधिष्ठिराकडून जी पाच गावे मागून घेतली होती त्यापैकी एक पानिपत!'' हे वाक्य घालून पाटील यांनी महाभारतच उलटे फिरवले आहे. दुर्योधनाने नव्हे तर युधिष्ठिराने दुर्योधनाकडून पाच गावे मागितली मात्र दुर्योधनाने ती देण्याचे नाकारले म्हणून तर महाभारत घडले.

पृ.३०७ वर पानिपतचा मुखिया पन्नास कोसात दगड नसल्याचे भाऊसाहेबांना सांगत असतानाच पृ.३०८ वर चिरेबंदी विहिरी भाऊसाहेबांना खुणावतात कशा? याशिवाय पृ.१६ वर 'कडेकोट' ऐवजी ''कडेलोट'', 'तपास' ऐवजी ''तलास'' (पृ.४५२) असे काही चुकीचे शब्दप्रयोग आले आहेत.

''पानिपत''मध्ये जशा काही सामान्य चुका आढळतात तसे काही असामान्य गुणही आढळतात. चांगल्या कादंबरीकारच्या ठिकाणी जे काही गुण असावे लागतात त्याचा प्रत्यय कादंबरी वाचताना येतो. उदा. इब्राहिमखान गारदी पानिपतच्या मैदानात अहमदशहा अब्दालीला बाणेदार उत्तर देतो तो प्रसंग. (पृ.४६१) गोविंदपंत बुंदेलेंच्या मृत्यूनंतर अहमदशहा अब्दालीच्या सेवकाला भाऊसाहेब प्रत्युत्तर देतात तो प्रसंग (पृ.३३५), किंवा बुराडी घाटावरील युद्धात दत्ताजी शिंदे यांच्या मृत्यूनंतर भागिरथीबाई जनकोजीस उद्देशून बोलतात तो प्रसंग (पृ.६१) या व अशा अनेक प्रसंगातून व घटनेच्या मांडणीतून लेखकाच्या ठिकाणी असणारे असामान्य गुण दिसून येतात.

पानिपत पराभवाला एकटा भाऊ जबाबदार नव्हता. मराठ्यांनी केलेल्या अनेक चुका आणि त्यांचे दुबळे राजकारण यांचा परिपाक होऊन पानिपतचा पराभव घडला याचे उत्तम व कलात्मक दर्शन ''पानिपत'' मध्ये घडले आहे. होळकरांची स्वार्थी चाल, मराठा सरदारातील अंतर्गत कलह, इब्राहिमखान व समशेरबहाद्दर यांच्या विषयी असणारा मराठे सरदारातील आकस. युद्धापूर्वी निर्माण झालेला अन्न दुष्काळ, अब्दालीस ऐनवेळी मिळालेली कुमक, विश्वासरावांचा अकस्मात झालेला मृत्यू. नानासाहेबांची वेळेवर न पोहचलेली मदत, पानिपतचा भौगोलिक प्रदेश, लढताना एकिचा आढळणारा अभाव. नजीबखानाला मिळालेले वारंवार जीवदान अशा ज्ञात–अज्ञात कारणांची उकल पानिपतकाराने केलेली आढळते. म्हणून तर त.दा. भोसले ''पानिपत''विषयी अभिप्राय नोंदविताना म्हणतात – ''पानिपत'' ही

कादंबरी म्हणजे पानिपतच्या युद्धावरील एक तटस्थ पण कलात्मक भाष्य म्हणता येईल. या विषयाचा एक नवा शोध, वेध आणि बोध घेण्याचा लेखकाने यशस्वी प्रयत्न केलेला आहे.''[१७] तर म. द. हातकणंगलेकर म्हणतात –'''पानिपत' कादंबरीत साहित्यिक गुणवत्ता निर्विवादपणे आहे. विषयाचा मोठा व्याप कवेत नीटपणे घेतला आहे. प्रसंगाची गुंफण व्यवस्थित केली आहे. त्यामुळे इतक्या विस्ताराची कादंबरी वाचणीय झाली आहे.''[१८]

भाऊसाहेबांचे जागोजागीचे मुक्काम, दिल्ली, कुंजपुरा, पानिपत, बुराडी यांचे भौगोलिक स्थान तेथील हवामान यांचा नेमका अभ्यास करुन घटनांचा कालक्रमही चुकून दिलेला नाही हे कादंबरीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणावे लागेल. म्हणून म.द. हातकणंगलेकर ''पांगिरा''च्या प्रस्तावनेत म्हणतात – '''पानिपत' ही कादंबरी केवळ आणखी एक ऐतिहासिक कादंबरी आहे. तिला प्राणभूत असणारी जाणीव गंभीर व आधुनिक मनाची आहे.''[१९]

पानिपतच्या पराभवाबरोबर युद्धातील एकूण कौर्य, कारुण्य व शौर्य अधोरिखित करुन मराठ्यांच्या युद्धातील शोकांतिकेला वाचकांची सहानुभूती मिळविण्यात पाटील यशस्वी झाले आहेत. ''पानिपत'' लिहण्यापूर्वी पानिपत विषयावर १९१४ साली लिहलेल्या ''दुर्दैवी रंगू''नेही तत्कालीन वाचकांचे व समीक्षकांचे मन वेधून घेतले होते. चिं. वि. वैद्य यांच्या या कादंबरीचे तत्कालीन कालखंडामध्ये स्थान वैशिष्टयपूर्ण व महत्वाचे मानले जाते. या कादंबरीविषयी रा.श्री. जोग म्हणतात– ''दुर्दैवी रंगू'' मुळे पानिपतच्या लढाईची हकिकत रमणीय झाली असेल पण, सुसंबद्धता आणि सुसंगती हे गुण मात्र तीत अवतरलेले नाहीत. ''दुर्दैवी रंगू''चा आणि पानिपतच्या लढाईचा संबंध स्वाभाविकपणे जुळलेला नाही. तो कृत्रिमरित्याच जोडण्यात आलेला आहे. रंगूचे दुर्दैव आणि पानिपतच्या लढाईमुळे मराठ्यांच्या वाट्याला आलेले दुर्दैव ह्याची प्रकृती आणि परिणाम दोन्ही वेगवेगळी आहेत. कल्पित रंगू ही केवळ पानिपतच्या युद्धाची एक साक्षीदार आहे. युद्धासाठी गेलेल्या काही व्यक्ती तिच्या भावजीवनात समाविष्ट असतीलही, पण त्यामुळे तिचा युद्धाशी काही संबंध प्रस्थापित होऊ शकत नाही. आणि म्हणूनच या कादंबरीतील

पानिपतच्या युद्धाची हकिकत बिनचूक असूनही कालदृष्ट्या बिनबुडी ठरते.''[२०] ऐतिहासिक दृष्ट्या कादंबरीची रचना ढिसाळ असली तरी तत्कालीन ऐतिहासिक कादंबरीत ''दुर्दैवी रंगू'' उजवी ठरते हे मान्य करावे लागेल.

''दुर्दैवी रंगू'' ही कलात्मक कादंबरी तत्कालीन कादंबरीच्या तुलनेत उजवी ठरत असली तरी पानिपतच्या युद्धास कारणीभूत असणाऱ्या नजीबखानास कादंबरीत स्थान नसल्याने कादंबरी परिपूर्ण, सर्वांगीण वाटत नाही मात्र याच विषयावरील ''पानिपत'' कादंबरी लिहणाऱ्या विश्वास पाटील यांनी इंग्लंडहून फारशी, अरबी बखारी मागवून त्यांची भाषांतर करुन नजीबाची व्यक्तिरेखा नव्या ताकदिने साकार केली आहे. पानिपतच्या रणांगणावरील अन्नदुष्काळ, जोतिष्यांचे प्राबल्य व सैन्याची हालाखी याबाबतीत दोन्ही कादंबऱ्यातील वर्णने अतिशय मनोवेधक आहेत.

## ▪ ''पानिपत''वरील समीक्षकांची मतमतांतरे :–

''पानिपत'' कादंबरी कितीही वाचकप्रिय असली तरी ''पानिपत'' वर समीक्षकांनी काही आक्षेप घेतले आहेत त्यातील प्रमुख आक्षेपांचा विचार करु.

''पानिपत'' कादंबरीवर टीका करणाऱ्यामध्ये प्रामुख्याने विद्या सप्रे यांचा पहिला नंबर लागतो. 'तरुण भारत' ९९ च्या दिवाळी अंकात त्यांनी अनेक चुका पुराव्यासह तपशीलवार दाखविल्या आहेत. त्यांचा प्रथम विचार करु.

१) ''पानिपत''कादंबरीच्या पृष्ठ क्र.८३ वर नाना पुरंदरे भाऊंना स्मरण देतात – ''नानासाहेब तुमच्याशी विदुरनीती, रघुवंश, चाणक्य आणि महाभारतावरही चर्चा करत. एखाद्या ओवीचा अर्थ न उमगला तर समजून सांगत'' आता ओवी प्रसिद्ध आहे ती ज्ञानेशाची संस्कृत साहित्यात कुठून आली? चुकून विश्वास पाटील यांच्याकडून 'श्लोका' ऐवजी 'ओवी' हा शब्द वापरला गेला असावा. याचप्रमाणे पृ. १८३ वर ''गोघाटावर साक्षात परमात्मा गाई म्हशी घेऊन पाणवठ्यावर यायचा.'' यावर प्रतिक्रिया व्यक्त करताना

विद्या सप्रे लिहतात– ''पाटलांच्या परिसरात म्हशी असतीलही! पण म्हणून त्यांनी गोपाळ कृष्णाला म्हशी वळवायला लावावं?'' (पृ.९९) या वाक्यातील श्रीकृष्णाला गाई राखाव्या लागल्या हे महाभारत सांगते मात्र यामागील म्हशीचा संदर्भ चुकीचा वाटतो.

२)''बाजीराव–मस्तानीची प्रेमकहाणी कित्येक लेखकांना भुरळ घालते. पण ती अधिक रोमांचकारी भासावी म्हणून लेखकाने इतिहासात नसती भर घालू नये. इतिहासात कुठेही मस्तानीला उद्देशून 'यवनी' हा शब्द वापरलेला नाही. तो विश्वास पाटीलांनी पृ.८९ वर नानासाहेबांच्या तोंडी घातलाय. आणि पृ.११६, ११७ वर समशेर बहाद्दर स्वतःला यवनीचा चेटकिणीचा पुत्र म्हणवतो. सदाशिव भाऊ यांन्ना वेडा व मस्तानीला चेटकीण म्हणने हा पाटलांचा अक्षम्य गुन्हा आहे (पृ.१०७)

विश्वास पाटील यांनी 'यवनी' हा वापरलेला शब्दप्रयोग यापूर्वीच वि.वा.शिरवाडकर यांच्या 'दुसरा पेशवा' या कादंबरीत पृ. २५ वर आला आहे. याशिवाय ना. स. इनामदार या प्रसिद्ध ऐतिहासिक कादंबरीकाराच्या ''शिकस्त'' या कादंबरीच्या पृ. ९ वरती 'यवनी' हा शब्दप्रयोग वापरण्यात आला आहे. त्यामुळे विश्वास पाटील यांच्या कादंबरीत वापरलेला शब्द अक्षम्य गुन्हा ठरत नाही.

अहंकारी, हट्टी म्हणून तत्कालीन समाजाने भाऊला ठरविले होते. त्याच अर्थाने पाटील यांनी 'वेडा' हा शब्दप्रयोग वापरला असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

३)''समशेर बहाद्दर हा काही अनौरस अपत्य मानला गेला नव्हता. पण पाटील मात्र इब्राहिमखान सारख्या परक्यासमोर समशेरच्या तोंडी स्वतःला उद्देशून 'ना घर का ना घाट का' पृ. ११५ व पृ. ११६ वर 'बिन साखळीचा कुत्ता' असली भाषा घालतात. बाजीरावाचा समशेरची मुंज करायचा आग्रह पूर्णपणे निराधार आहे असे सर्व रियासती व प्रमोद ओककृत 'पेशवाईचा इतिहास' सांगतो'' (पृ.१०९)

समशेर बहाद्दर हा औरस पुत्र मानला गेला असल्याचे इतिहास सांगतो हे विद्याताईंचे वाक्य पूर्णपणे इतिहासाला धरुन आहे. मात्र समशेर बहाद्दरला औरस पुत्राप्रमाणे सर्व अधिकार व मान मिळायला हवा होता परंतु, तत्कालीन काळाचा विचार करता त्याला तो अधिकार मिळणे समाजबाह्य होते. म्हणून त्याला

तत्कालीन समाजात अधिकार व मान मिळाला नसल्याचे इतिहासातून दिसून येते. त्यामुळेच 'ना घर का ना घाट का', 'बिन साखळीचा कुत्ता' अशी पाटील यांनी वापरलेली वाक्ये बरोबर वाटतात.

४) गोपिकाबाईंनी 'धरण' हा शब्दही ऐकला नसेल, पण पृ. ४९४ वर त्या फुटलेले धरण एकट्याने कवेत घेण्याची भाषा करतात. तर पृ. १५९ वर 'पराक्रमाच्या अग्निकुंडात जोहार करण्यासाठी उभा ठाकलेला दत्ताजीचा मुखडा ...' पाहून मला प्रश्न पडतो पद्मिनीनं जोहार केला होता. पण पुरुष कधीपासून जोहार करु लागले?'' (पृ. १११)

लेखक ज्या प्रदेशातून येतो त्या प्रदेशातील भाषा न कळत त्याच्या साहित्यातून प्रकट होते. त्याप्रमाणे स्वातंत्र्योत्तर काळातील काही शब्द कादंबरीत आले आहेत. त्यापैकीच 'धरण' हा एक शब्द होय. पृ. १५९ वरील घटनेवरुन (प्रसंगावरुन) 'जोहार' हा शब्द प्रयोग आत्मसमर्पण या अर्थाने पाटील वापरत असतील तर वरील आक्षेप चुकीचा वाटतो.

५) '' 'पानिपत'ची पार्श्वभूमी समजून घेऊन लेखकाने आत्मचिंतन मांडलं असतं तर ''पानिपत'' ही 'वॉर अँड पीस' च्या तोडीची कादंबरी झाली असती. पण लेखकाने ही संधी गमावली. प्रत्यक्ष ज्ञानापेक्षा नावाशी संबंधित पुरस्काराची अपेक्षा ठेवली की असंच होत असतं, आता 'पानिपत' म्हणजे पटदूर ते पानिपत व पानिपत ते पुणे या कंटाळवाण्या प्रवासवर्णनासह युद्धाच्या खणाखणीपलीकडे काही नाही.'' (पृ. ११३)

वरील मताचा विचार करता असे आढळून येते की ''पानिपत'' कादंबरी आत्मचिंतनाच्या बाबतीत थोडी उणी पडली असली तरी ऐतिहासिक साधनांचा वापर करुन पानिपतची घटना सुयोग्य लावण्यात लेखकाला यश आले आहे. अगदी बारीक सारीक घटना प्रसंगाचे तपशीलवार वर्णन केल्याने थोडीफार पाल्हाळीक झाली असेल परंतु युद्धाच्या खणाखणीपलीकडे काही नाही असे म्हणता येणार नाही.

६) ''क्वचित प्रसंगी भाषेचे, काळाचे अनुसंधान सुटते आणि नानासाहेबांचे वजन ८४ किलोवरुन ५५ किलोवर आले यासारखे एखादे वाक्य येते.'' [२१]

विश्वास पाटील यांची ''पानिपत'' ही पहिलीच साहित्यकृती असल्याने त्यात पहिलेपणाच्या काही चुका आढळून येणे स्वाभाविक आहे.

७) ''प्रल्हाद वडेर यांनी 'पानिपत' व 'ताम्रपट' यासारख्या प्रचंड भारुडात प्रतिभेचा स्पर्श आढळत नाही''[२२] अशी टीका केली आहे. वडेर यांच्या या विधानाला माधव कोंडविलकर यांनी पुष्टी देऊन ''त्यांच्या कादंबऱ्यात भरपूर कष्ट व कारागिरी असते. पण त्यांचं साहित्य टिकाकार डोक्यावर घेतात.''[२३] असा शेरा मारला आहे.

या ठिकाणी प्रल्हाद वडेर यांनी कादंबरीत कुठे प्रतिभेचा स्पर्श आढळत नाही. याचे विस्तारपूर्वक विवेचन केलेले नाही. केवळ ठोकळेवजा वाक्य वापरुन टीका केली आहे. मुळात कादंबरीत प्रतिभेचा स्पर्श नाही म्हणजे नेमके काय नाही? मुळात लेखकाजवळ प्रतिभा असल्याशिवाय त्याच्या हातून कादंबरीची निर्मिती होणार नाही. पाटील कादंबरीसाठी खूप कष्ट घेतात मात्र, ते कष्ट उपसण्याची गरज आहे. ऐतिहासिक कादंबरी लिहताना ती अधिकाधिक वास्तव पातळीवर उतरण्यासाठी जुणी कागदपत्रे, बखारी, तत्कालीन पत्रे, हस्तलिखिते यांचा अभ्यास करणे जरुरीचे असते. नाहीतर निव्वळ कल्पनेवर भराऱ्या मारुन लिहलेल्या कादंबऱ्या काळाच्या ओघात नाहिशा होतील. मुळातच ऐतिहासिक कादंबरी लिहताना ऐतिहासिक सत्य व कल्पकता यांचा संयोग घडवून आणावा लागतो. हा संयोग म्हणजे लेखकाच्या दृष्टीने तारेवरची कसरत असते. जास्तीतजास्त इतिहासाशी इमान राखून ऐतिहासिक सत्य मनोरंजनाच्या पातळीवर उतरविण्यासाठी लेखकाला प्रयत्नांची पराकाष्ठा करावीच लागेल. आणि हे सर्व करणे म्हणजे नुसती कारागिरी नव्हे.

'पाटील यांच्या कादंबऱ्यात कारागिरी असते.' कोंडविलकरांचे हे ही विधान चुकीचे वाटते कारण पाटील यांच्या सर्वच कादंबऱ्यांचा बारकाईने अभ्यास केल्यास असे लक्षात येते की त्यांनी हाताळलेले विषय संपूर्णतः भिन्न स्वरुपाचे आहेत व वेगवेगळ्या विषय असणाऱ्या कादंबऱ्यांची निर्मिती म्हणजे नुसती कारागिरी ठरु शकत नाही.

## ■ समारोप :–

''पानिपत'' मधील शोकात्मिका ही इतिहासाच्या पडद्यावरील वास्तव आहे. इतिहासातील घटना–प्रसंग वास्तवात आणताना मराठ्यांच्या भावनिक व कारुण्य पातळीसह चित्रित करण्यात लेखकाची लेखणी यशस्वी झाली आहे. मराठा वीरांचे जीवन पराभव होऊनही एका बाजूने कृतार्थ आहे तर दुसऱ्या बाजूने पूर्ण पराजित आहे. या उलट स्थिती अहमदशहा अब्दालीची आहे. एकूणच पानिपतच्या निमित्ताने मराठ्यांच्या जीवनात साधलेला दैवदुर्विलास लेखकाने अतिशय कल्पकतेने वास्तवाला धरुन रेखाटला आहे. म्हणून विश्वास पाटील यांना पहिल्याच कादंबरीविषयी वाटते. ''ऐतिहासिक कादंबरी केवळ शब्दात न हरवता हाडामासाची आणि आजवरच्या परंपरेत वेगळी ठरावी हे उद्दिष्ट पूर्ण झाले.''[२४]

स्वातंत्र्योत्तर काळात आजही शिवकाल, पेशवेकाल मराठी माणसाला स्वाभिमान जागविणारा वाटतो. त्यातही कालदृष्ट्या जवळच्या असलेल्या पेशवाईतील तरुण मराठा सरदारांचे हौतात्म्य मराठी माणसांबरोबर विश्वास पाटील यांनाही आकर्षित करणारे ठरले. तरुणपिढीचा स्वदेशाभिमान व सर्वस्वाचा त्याग करण्याची त्यांची वृत्ती केंद्रस्थानी ठेऊन त्यांच्या आयुष्याचे चित्रण करताना सद्यकालीन तरुणांना मार्गदर्शन करावे व इतिहासापासून त्यांनी काहीतरी घ्यावे हा उद्देश कादंबरीतून सफल झाला असल्याचे वाटते.

एकंदर भाषाशैली, वर्णनशैली, निवेदन पद्धती व व्यक्तिचित्रे यांची सांगड घालून प्रभावी मांडणी कादंबरीत केल्याने आजच्या कादंबरीत महत्वाची ठरावी अशी कादंबरी आहे.

## ■ निष्कर्ष :–

* सुरुवातीच्या ऐतिहासिक कादंबऱ्या पौराणिक कादंबरीच्या वाटेने वाटचाल करीत राहिल्या तर १९१० ते १९३५ पर्यंतच्या बऱ्याचशा कादंबऱ्यामधून अद्‌भुतरम्यता, तोच तो अतिरंजितपणा व तिच ती

प्रणयसंकुलता इत्यादी गुण हटकून आढळतात. ''सत्तावनच्या सेनानी'' या वरखेडकरांच्या कादंबरीपासून नव्या काळातील ऐतिहासिक कादंबरीची सुरुवात होते.

* पेशवेकाळ व शिवकाळाबरोबरच मराठी कादंबरीकारांनी रजपूतांचा इतिहास मराठी ऐतिहासिक कादंबरीतून प्रभावीपणे उभा केला.
* स्वातंत्र्योत्तर कालखंडात प्रामुख्याने समाजात बदनाम ठरलेल्या स्त्री–पुरुषांच्या जीवनातील सुसंगती शोधण्याचा प्रयत्न अलिकडील काही लेखकांनी केला व तो खूपच यशस्वी झाला.
* भाऊसाहेबांचे तत्कालीन समाजाने किंवा परंपरेने आलेले अहंकारी, हट्टी, गर्विष्ठ रुप बाजूला करुन भाऊचे खरे रुप पाटील यांनी अथक परिश्रमाने वाचकांसमोर आणले.
* पानिपतवरील अनेक कादंबऱ्यातून उपेक्षित असलेल्या नजीबखान रोहिल्यास प्रचंड ताकदीने न्याय देऊन त्याच्या कुटील राजनीतीसह वाचकांसमोर आणला आहे.
* कादंबरीत असंख्य व्यक्तिरेखा असल्यातरी प्रमुख व्यक्तिरेखा आपले स्वतंत्र अस्तित्व घेऊन वाचकांसमोर प्रकटतात.
* कादंबरीत स्त्रिया प्रसंगानुरुप येत असल्या तरी त्यांची उदात्त व तत्कालीन परिस्थितीचे आव्हान पेलण्याची क्षमता दृष्टीस येते. त्या एक आदर्श स्त्रिया म्हणून वाचकांसमोर येतात.
* कादंबरीत काल्पनिक पात्रे, घटना–प्रसंग आले आहेत. तरीही ती वास्तवापासून दूर जात नाही.
* कादंबरीची भाषा प्रतिकात्मक, उपमा व रुपक, म्हणी, वाक्प्रचार यांनी युक्त असून ही साधी सरळ व आकलनास सोपी आहे. तिला ग्रामीण भाषेचा बाज असल्याने कादंबरीतील निसर्गवर्णने व ऋतुवर्णने विस्तृत व चित्रदर्शी झाली आहेत.
* तरुण पिढीची सारी वैशिष्टये मराठा वीरांच्या रुपाने पानिपतकारांनी साकार करुन तरुणपिढीपुढे देशाभिमान व स्वदेशप्रितीचा आदर्श घालून दिला आहे.

* ''पानिपत'' कादंबरीतून मराठ्यांचे सर्वोत्कृष्ट गुण आणि दुर्गुण यांचे यथार्थ दर्शन घडते. मुसलमानांची क्रौर्याची पद्धत, मन पिळवटून टाकणारी कत्तल यांचे वास्तव चित्र पानिपतकाराने उभे केले आहे. कादंबरी शोकात्मक अनुभव देतेच परंतु वर्तमानकालीन विचार करायला प्रवृत्त करते.

■ **तळटीपा :–**

१. प्रा.अविनाश सप्रे
'प्रदक्षिणा'
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
प्रथमा – १९९१
पृ.६८

२. तत्रैव
खंड दुसरा (१९४७ नंतरच्या, स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी वाङमयाचा चिकित्सक ऐतिहासिक आढावा.)
पृ. १३३

३. डॉ.वि.भा. शहा
'मराठी ऐतिहासिक कादंबरी : एक अभ्यास'
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.
प्रथमावृत्ती – सप्टेंबर १९९८
पृ. ७०

४. तत्रैव
पृ. १३०

५. नरहर कुरुंदकर
'धार आणि काठ'
देशमुख आणि कंपनी, पुणे.
चौथी आवृत्ती १९९८
पृ. २२०

६. ना.स. इनामदार
'झुंज'
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
प्रथमा – १९६३
प्रस्तावना पृ. ४

| | | |
|---|---|---|
| ७. | डॉ.वि.भा. शहा | 'मराठी ऐतिहासिक कादंबरी : एक अभ्यास '<br>मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.<br>प्रथमावृत्ती – सप्टेंबर १९९८<br>पृ. ७० |
| ८. | भालचंद्र नेमाडे | 'वाङमयीन शैली आणि तंत्र'<br>साकेत प्रकाशन, औरंगाबाद.<br>पृ. १३९ |
| ९. | विद्या सप्रे | 'महानायकाची झाडाझडती आणि पानिपतदेखील ...'<br>तरुण भारत दिवाळी अंक – १९९९<br>पृ. १११ |
| १०. | के.डी. नाईक | 'रणांगण रंगलेच नाही'<br>'रुची'<br>मे – १९९९, पृ. ११ |
| ११. | विश्वास पाटील | प्रत्यक्ष घेतलेली मुलाखत |
| १२. | शंकर सारडा | 'साप्ताहिक सकाळ'<br>पानिपत चौथी आवृत्ती<br>ललित – सप्टेंबर १९८८<br>पृ. ६ |
| १३. | दि. के. बेडेकर | 'विचार यात्रा : ऐतिहासिक कादंबरी काही विचार'<br>लोकवाङ्मय गृह प्रकाशन<br>प्रथमा – १९७५, पृ. ११९ |

| | | |
|---|---|---|
| १४. | मुरलीधर सायनेकर | 'ललित'<br>(१९८८ मधील कादंबरी)<br>डिसेंबर – १९८९<br>पृ. २१ |
| १५. | प्रा.स.शि.भावे | 'ग्रामीणता आणि वास्तव'<br>डॉ. आनंद यादव<br>मेहता प्रकाशन, पुणे.<br>प्रथमा – १९८५<br>प्रस्तावना – पृ. ३ |
| १६. | विद्या सप्रे | 'महानायकाची झाडाझाडती आणि पानिपतदेखील ... '<br>तरुण भारत दिवाळी अंक – १९९९<br>पृ. १०३ |
| १७. | त.दा. भोसले | 'पानिपत : एक भव्य साक्षात्कार'<br>म.सा. पत्रिका<br>जानेवारी–मार्च – १९८९ अंक – २४८<br>पृ. २० |
| १८. | म.द. हातकणंगलेकर | 'साहित्य विवेक'<br>१९६० नंतरची लोकप्रिय मराठी कादंबरी (लेख)<br>प्रतिमा प्रकाशन, पुणे.<br>प्रथम आवृत्ती – १९९७<br>पृ. १३७ |

१९. म.द. हातकणंगलेकर 'पांगिरा'
प्रस्तावनेवरुन उद्‌धृत (लेखक–विश्वास पाटील)
ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.
पृ. ३

२०. रा. श्री. जोग 'मराठी वाङ्मय'चा इतिहास – खंड पाचवा भाग–१'
(१९७५ ते १९२०)
महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे.
प्रथमा – १९७३

२१. शंकर सारडा 'ग्रंथविशेष'
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे .
प्रथमा – जानेवारी १९९१
पृ. २२

२२. प्रल्हाद वडेर 'अंतर्नाद'
जानेवारी – १९९९
पृ. ७

२३. माधव कोंडविलकर 'अंतर्नाद'
फेब्रुवारी – १९९९
पृ. ६

२४. अनंत गुरव 'ललित'
आक्टोंबर – १९८९
पृ. २८